| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १८९ वा | मंगळवार दिनांक ०७ ऑक्टोंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- अवैध मद्य विरोधी कारवाई करण्यात आली असून पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, भुम पोलीस ठाणे: अंतर्गतजनाबाई रा. बसस्थानकचे पाठीमागे भुम ता. भुम जि.धाराशिव या दि.०५.१०.२०२५ रोजी भुम बसस्थानकचे पाठीमागे अंदाजे ८०० किंमतीची ०८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर दत्ता रा. बसस्थानकचे पाठीमागे भुम ता. भुम जि.धाराशिव हे दि.०५.१०.२०२५ रोज भुम बसस्थानकचे पाठीमागे भुम येथे अंदाजे १,००० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर संजय बालाजी रा. बसस्थानकचे समोरील बाजूस भुम ता. भुम जि.धाराशिव हे दि.०५.१०.२०२५ रोजी भुम बसस्थानकचे पाठीमागे भुम येथे अंदाजे १,५०० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरती रा. कल्याणनगर पारधी पिडी भुम ता. भुम जि.धाराशिव हे दि.०५.१०.२०२५ रोजी ०९.५० वा. सु भुम बसस्थानकचे समोरील बाजूस भुम येथे अंदाजे १,५०० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

### बसस्थानक तुळजापूर येथे झोपले असता पैसे चोरले

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे फिर्यादी हरीभाउ रामराव काकडे, वय ५५ वर्षे, रा. जयपुर ता. मंठा जि. जालना हे दि.०२.१०.२०२५ रोजी लातुर रोड नविन बसस्थानक तुळजापूर येथे प्लॅटफार्मवर झोपलेले असताना रमेश रा. एन ४ सिडको संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी हरीभाउ काकडे यांचे पाठीमागील पॅन्टच्या खिशातील ५०० चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-हरीभाउ काकडे यांनी दि.०३.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### येरमाळ बसमध्ये चढताना गंठण चोरले

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सोजराबाई शिवाजी भिल्ल, वय ७५ वर्षे, रा. पेट्रोल पंप समोर दत्तनगर वाशी ता. वाशी या दि.०१.१०.२०२५ रोजी बसस्थानक येरमाळा येथे बार्शी जाणारे बसमध्ये चढत असताना सोजराबाई भिल्ल यांचे गळ्यातील १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण अंदाजे ३५,००० किंमतीच अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## हे संकट अभूतपूर्व, आपण शेतकऱ्यांसमवेत आमदार पाटील यांनी कळंब तालुक्यातील नुकसानग्रस्त गावांची केली पाहणी



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- कळंब, वाशी आणि भूम तालुक्यात पुन्हा एकदा अतिवृष्टीने धुमाकूळ घातला आहे. कळंब तालुक्यातील बहुतांश गावामध्ये अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे तेरणा नदी पात्र सोडून ओसंडून वाहत आहे. पाण्याचा भला मोठा प्रवाह नदीपात्रा बाहेरून वाहत असल्याने सगळ्या शिवारात पाणी शिरले आहे. इटकूर परिसरातील वाशीरा नदीही पात्र सोडून एक किलोमीटर अंतरावरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या घरांचे, दुकानांचे आणि शेतशिवाराचे अतोनात नुकसान झाले आहे. कळंब तालुक्यातील देवळाली, ढोराळा परिसरात झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदना जाणून घेतल्या. या संकटकाळात ठामपणे त्यांच्यासोबत उभे असल्याचा विश्वास दिला. सर्वांना सरसकट मदत मिळेपर्यंत आपण पाठपुरावा करीत राहणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

शनिवारी रात्री भूम, कळंब आणि वाशी तालुक्यात पुन्हा एकदा मुसळधार पावसाचा जोर वाढला आहे. कळंब तालुक्यातील सहापैकी चार महसूल मंडळात अतिवृष्टी नोंदवली गेली आहे. अनेक गावांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली नसली तरीही, स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. जवळा खुर्द गावात मुख्य रस्त्यावरून नदीप्रमाणे पाण्याचा प्रवाह वाहत आहे. चौकाला सरोवराचे रूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे गावातील दुकानांमध्ये घरांमध्ये पाणी शिरून अतोनात नुकसान झाले आहे. हे संकट खरोखर अभूतपूर्व असेच आहे. जलप्रकोप म्हणजे काय याचे अनुभूती सर्वांना येत आहे. अशा काळात आपण स्वतः जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसोबत ठामपणे उभे आहोत. कळंब तालुक्यात उडवलेल्या या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सकाळपासून नुकसानीची पाहणी केली. नदीकाठच्या गावांमध्ये झालेले नुकसान शब्दात सांगता येणार नाही. यापूर्वीच शेतजमिनी खरवडून गेलेली आहे. पुन्हा एकदा प्रचंड मोठा प्रवाह नदीपात्र सोडून वाहत असल्यामुळे नुकसानीची व्याप्ती वरचेवर वाढताना दिसत आहे. त्यामुळे प्रशासनाला तातडीने या सगळ्या बाबींची नोंद घेण्याचे निर्देश दिले आहेत. कागदोपत्री नियमावली बाजूला ठेवून शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी शक्यतो सर्वतोपरी बाबी करण्याचेही सांगितले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

राज्य सरकारच्या माध्यमातून तातडीने मदत देण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्या अनुषंगाने महत्वपूर्ण निर्णय अपेक्षित आहेत. हे नुकसान खूप मोठे आहे. शासकीय अनुदान आणि मदतीपेक्षाही भरीव आणि दीर्घकालीन उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठीच राज्य आणि केंद्र सरकारच्या मदतीने क्राऊड फंडिंगचा उपक्रम देखील अंमलात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या मदतीव्यतिरिक्त इतर माध्यमातून भरीव आणि विशेष सहकार्य करण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. कळंब तालुक्यातील पाडोळी येथील शेतकरी विजयकुमार सत्यनारायण जोशी शेतातून घरी परतत असताना पुराच्या पाण्यात अडकले. रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे निपाणी नदीला मोठा पूर आला होता. पुराच्या पाण्यात जोशी स्वतःला सावरू शकले नाही. ते वाहून गेले त्यामुळे विजयकुमार जोशी यांचे अकाली निधन झाले. ही अतिशय वेदनादायी आणि हृदय हेलावून टाकणारी दुर्घटना आहे. मुरुड येथे विजयकुमार जोशी यांच्या घरी सांत्वनपर भेट देऊन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी कुटुंबियांचे सांत्वन केले आणि त्यांच्या स्मृतींना अभिवादनही केले.

## अवैध गांजा विरुध्द स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई आरोपी ताब्यात



धाराशिव (प्रतिनिधी)- जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोकर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला जिल्ह्यामध्ये अमली पदार्थ विक्री करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आदेशित केले होते. दिनांक ०४.१०.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथकाला खबर मिळाली की एक इसम वाशी पोलीस ठाणे अंतर्गत मांडवा येथे गांजा विक्री करता येणार आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ पोस्टे वाशी पोलिसांच्या मदतीने सदर ठिकाणी सापळा रचून छापा टाकला असता एक इसम आणि ०७ पॉकेट गांजा मिळून आला. त्यास तात्काळ ताब्यात घेऊन घटनास्थळावरून १४.२३६ किलो हिरव्या रंगाचा उग्र वास येत असलेला गांजा एकूण किं. २,८४,७२०/- रू. किमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव- संजय रा. मांडवा ता. वाशी, जि. धाराशिव असे असून त्याचे विरुद्ध पोलीस ठाणे वाशी गुरन ३२३/२५ कलम ८ क सह २०, (२), ब, एन डी पी एस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सदरचा गांजा कुठून आणला तसेच तो कोणाला विक्री करत होता याबाबत तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक श्रीमती. रितु खोखर व अपर पोलीस अधिक्षक श्रीमती. शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि:- सुदर्शन कासार,पोह- शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, दत्तात्रय राठोड, फरहान पठाण, दयानंद गादेकर, पोलीस अंमलदार- योगेश कोळी, चालक पोह- सुभाष चौरे, चालक पोलीस अंमलदार रत्नदीप डोंगरे, पोह- बाबा जाधवर पोस्टे वाशी, पोलीस अंमलदार- विठ्ठल मलंगनेर पोस्टे वाशी, नागनाथ गुरव यांचे पथकाने केली आहे.

## पुराच्या पाण्यात शेतकरी गेला वाहून ! कळंब तालुक्यातील पोडोळी येथील घटना

कळंब / तालुक्यात आनेक गातात रविवारच्या मध्यरात्रीपासून पावसाने दुसऱ्यांदा थैमान घातल्यामुळे नद्या आणि ओढे प्रचंड वेगाने वाहत आहेत. त्यातच निपाणी-पाडोळी च्या ओढ्याच्या पुरात पाडोळी येथील एका शेतकऱ्याचा हृदयद्रावक मृत्यू झाल्याची घटना दि. ५ रोजी सकाळी सहा वाजता घडली आहे.

रविवारी सकाळी सहा वाजता, पाडोळी येथील शेतकरी विजयकुमार सत्यनारायण जोशी (वय ४३) हे त्यांच्या नेहमीच्या कामासाठी, म्हणजे दूध आणण्यासाठी आणि जनावरांना चारा देण्यासाठी शेतात गेले होते. शेतातून घरी परत येत असताना, निपाणी - पाडोळी ओढ्यावर पाण्याची पातळी खूप वाढली होती. बंधाऱ्यावरून पाणी जोरात वाहत असल्यामुळे पाण्याची खोली आणि प्रवाहाचा वेग याचा अंदाज त्यांना आला नाही. दुर्दैवाने, हा अंदाज चुकल्यामुळे पाण्याच्या प्रचंड प्रवाहाने त्यांना ओढून नेले. वाहत्या पाण्यात त्यांचा मृत्यू झाला आणि पाडोळी गावावर शोककळा पसरली.

मुरुड रुग्णालयात शवविच्छेदन

पावसाच्या या भयानक तांडवाचा हा बळी ठरलेल्या विजयकुमार जोशी यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी मुरुड येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहे

## धम्मचक्र प्रवर्तन दिनी ६० कुटुंबीयांनी घेतली दीक्षा

धाराशिव भारतीय बौद्ध महासभा धाराशिव दक्षिण जिल्ह्याच्या वतीने अशोक विजयादशमीच्या निमित्ताने धाराशिव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णकृती पुतळा परिसरात धम्मदीक्षा सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले होते. ६० कुटूंबानी धम्मदीक्षा घेतली.

भारतीय बौद्ध महासभा धाराशिव दक्षिणच्या वतीने आयोजित धम्मदीक्षा सोहळ्यामध्ये भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला राजश्री कदम व सहकारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी गुणवंत सोनवणे, बाबासाहेब बनसोडे यांनी उपस्थितांना त्रिशरण पंचशील दिले. जि.संघटक प्रा.सुधीर कांबळे यांनी अशोका विजयादशमीच्या औचित्याने उपस्थितांना मार्गदर्शन केले. तद्नंतर समता सैनिक दलाचे जिल्हा सचिव डिव्हिजन ऑफिसर अनिल सरतापे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना दिली. भारतीय बौद्ध महासभे धम्मदिक्षा कार्यक्रमांमध्ये ६० कुटूंबांनी धम्मदिक्षा घेतली तर ३ नागरिकांनी वैयक्तिक धम्मदिक्षा ग्रहण केली.

कार्यक्रमास भारतीय बौध्द महासभेचे जिल्हा सरचिटणीस विजय बनसोडे, धनंजय वाघमारे, जिल्हा पर्यटन उपाध्यक्ष विश्वासभाऊ पांडागळे, जि.संस्कार सचिव रत्नदीप मस्के, किरण धाकतोडे, ब्रह्मानंद गायकवाड यांच्यासह समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभेचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून गरीब व मध्यम कुटुंबातील लोकांचे जीवनमान उंचावले आहे- जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे

धाराशिव दि.६ ऑक्टोबर (जिमाका) कोजागरी पौर्णिमेनिमित्त तुळजापुरला पायी चालत जाणाऱ्या भाविकांनी मल्टिमीडिया प्रदर्शनच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजंनाचा लाभ घ्यावा.असे आवाहन डॉ. निलेश देशमुख यांनी केले. कोजागरी पौर्णिमेनिमित्त माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो सोलापूर,जिल्हा माहिती कार्यालय आणि जिल्हा पोलीस प्रशासन धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी टोल प्लाझा येथे ११ वर्षे सेवा सुशासन आणि गरीब कल्याण या विषयावर आयोजित केलेल्या दोन दिवसीय डिजिटल मल्टिमिडीया प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी डॉ. देशमुख बोलत होते.

प्रदर्शनचे उदघाटन जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे आणि तुळजापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.निलेश देशमुख यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि फीत कापून करण्यात आले. यावेळी क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव,पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकूर,तामलवाड़ी टोल प्लाज़ाचे व्यवस्थापक विवेक गडीकर,सहायक व्यवस्थापक किरण भगत,शाहू भोसले,श्रीनिवास साळुंके आदि मान्यवर उपस्थित होते.



श्री.खडसे म्हणाले की,केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजना,जल जीवन मिशन,महात्मा फुले जन आरोग्य आणि आयुष्मान भारतसारख्या कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून गरीब व मध्यम कुटुंबातील लोकांचे जीवनमान उंचावले आहे. तसेच देशामध्ये विविध पायाभूत सुविधांमध्ये होत असलेल्या विकासकामामुळे नागरिकांचे आयुष्य आरामदायी व सुखकर होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मजबूत आणि कणखर निर्णय आणि विदेश नीतीमुळे भारताचे नाव संपूर्ण जगामध्ये गाजत आहे असे यावेळी श्री.खडसे यांनी सांगितले.

अश्विन पौर्णिमेनिमित्त आई तुळजाभवानी देवीजींची निघणारी छबिना मिरवणूक पाहण्यासाठी आणि दर्शनासाठी कर्नाटक, आंध्रप्रदेश,तेलंगाना आणि महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्ह्यातून येणाऱ्या बहुभाषिक भाविकांना केंद्र सरकारच्या योजनांची माहिती मिळावी या अनुषंगाने केंद्रीय संचार ब्यूरोच्या वतीने मोठ्या एल.ई.डी स्क्रीनचा माध्यमातून मराठी,तेलगु आणि कन्नड भाषेतून माहिती उपलब्ध केली आहे. असे अंबादास यादव यांनी प्रास्ताविकेतून सांगितले तसेच पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या निर्णायक नेतृत्वाखाली भारताने माघील ११ वर्षात विविध क्षेत्रात केलेली कामगिरी,देशात जलदगतीने होत असलेली विकासकामे आणि धोरणांची माहितीसह विकसित भारताचा अमृत काळामध्ये घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रम विषयीची माहिती या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आली आहे.असेही श्री.यादव यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.संतोष पवार यांनी मानले.हे प्रदर्शन दिनांक ६ ऑक्टोबरपर्यंत २४ तास सर्वांसाठी विनामूल्य असणार आहे.प्रदर्शनातील चित्रे व मजकूर डिजिटल एल ई डी स्क्रीनमध्ये असल्याने रात्रीच्या वेळी पाहण्याचे विशेष आकर्षण असणार आहे.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भाविकांना अल्पोपहार देण्यात आले. सांगोला येथील जय भवानी कलापथक पथकाचे शाहीर सुभाष गोरे आणि त्यांच्या सहकारी कलावंतांनी पोवाड्याच्या माध्यमातून केंद्रीय योजनांची माहिती देऊन भाविकांचे विविध भक्तिगीतांनी मनोरंजन केले. प्रदर्शनच्या आयोजनसाठी केंद्रीय संचार ब्यूरोचे कार्यालय सहायक जे.एम. हन्नुरे,योगी कोंडाबत्ती,निलेश कोटा,तामलवाड़ी पोलिस प्रशासन व टोल प्लाजाचे श्री शिंदे,आदी कर्मचा-यानी सहकार्य केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## काय तो एकदाचा निर्णय घ्यावा

भारत आणि पाकिस्तान दरम्यान सतत वाद निर्माण होत आहेत. पाकिस्तान किती खालच्यास्तरावर जाऊ शकतो याचा अंदाज परवाच्या क्रिकेट खेळावरून दिसून आला. पाकिस्तानची हार झाली असताना ट्रॉफि घेवुन जाताना दिसला. यावरून पाकिस्तान कधी कोणत्यावेळी खालच्या नीच स्तराला जाईल हे सांगता येत नाही. पंच्याहत्तर वर्ष झाली तरी तो भारताला मित्र मानत नाही शत्रु मानत आहे व हिंसा घडवित आहे. किती तरी भारतीय जवान शहीद झाले आहेत. पाकिस्तान हा देश हुशार आहे, अतिरेक्यांच्या मार्फत तो भारतीयांच्या हत्या करीत आहे. जम्मू-काश्मीरमध्ये घूसून भारतीय जवानावर गोळ्या घातल्या जातात. मुळात स्थानिकांचा मोठा पाठिंबा असल्याने पाक अतिरेकी भारतीयांची हिंसा करून सीमावर्तीभागातून पसार होता. पाच जवान शहीद होता एक अतिरेकी मारला जातो. हे प्रमाण पाहिले तर विचार करायाला लावणारे आहे. त्यामुळे केवळ ऑपरेशन करून चालणार नाही तर कायमचा काटा काढणे व्यवहार्य ठरणारे आहे. 'कुत्र्याचे शेपूट बारा महिणे नळीत ठेवले पुन्हा बाहेर काढले तर वाकडेच्या वाकडे ' असते'. त्यासारखी पाकिस्तानची स्थिती आहे. भारत हा शेतारी व मित्र देश आहे. भारतापासून आपण वेगळे झालो आहोत. प्रगती विकास साधण्यापेक्षा हिंसा घडविणे योग्य ठरणारे नाही. ही अक्कल केंव्हा येणार? त्यामुळे आता सर्व भारतीयांनी विचार केला पाहिजे की, पाकला वटणीवर आणण्याचा! आता तर भेकडपने वक्तव्य वरचेवर केले जात आहे. त्याला भारताने प्रतित्तर दिले आहे व यापुढेही दिले पाहिजे. पाकला दहशतवादाला खतपाणी घालणे थांबवा, अन्यथा नकाशावरून मिटवू, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला होता. यावर आता पाकिस्तानने प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तानी लष्कराने म्हटले आहे की, आमचे सैन्य शत्रूच्या घरात घुसून लढाई करण्यास सक्षम आहे. पाकिस्तानी लष्कराने यासंदर्भात एक अधिकृत निवेदन जारी केले आहे. यामध्ये म्हटले आहे की, भारताचे संरक्षण मंत्री, लष्करप्रमुख व हवाईदलाच्या प्रमुखांनी चिथावणीखोर वक्तव्ये केली आहे. मात्र, त्यांना माहिती असायला हवे की भविष्यात कुठल्याही प्रकारचा संघर्ष खूप विनाशकारी ठरू शकतो. पाकिस्तानी लष्कराने म्हटले आहे की शत्रुत्वाचा नवा टप्पा सुरू झाला, पुन्हा एकदा युद्ध सुरू झाले तर पाकिस्तान देखील मागे हटणार नाही. आम्ही कुठलाही संकोच न बाळगता, संयम न राखता जशास तसे प्रत्युत्तर देऊ. नवे पायंडे पाडण्याचा विचार करणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे की पाकिस्ताननेही आता नवी पद्धत स्वीकारली आहे. ही पद्धत वेगवान, निर्णायक व विनाशकारी असेल. अधिकृत निवेदनात पाकिस्तानने असे ही म्हटले आहे की, अनावश्यक धमक्या आणि कारण नसताना केलेल्या हल्ल्यांना तोंड देताना, पाकिस्तानचे लोक, सशस्त्र सेना शत्रूच्या प्रदेशात लढण्याची क्षमता व दृढनिश्चय बाळगून आहे. भारतात घुसून लढण्याची ताकद पाकिस्तानी लष्कराकडे आहे. या वेळी आम्ही भौगोलिक सीमांमागील धारणा मोडून काढू आणि देशाच्या (भारताच्या) सर्वात दुर्गम भागांत घुसू. पाकिस्तानला नकाशावरून हटवण्याच्या बाबतीत भारताने मोठी तयारी केली पाहिजे. युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम दोन्ही बाजूंना भोगावा लागेल. ऑपरेशन सिंदूरनंतर, भारताची पाकिस्तानविरुद्धची भूमिका आणखी कठोर झाली पाहिजे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी शुक्रवारी गंगानगरमधील घडसाणातील गावांना भेट दिली आणि येथून पाकिस्तानला इशारा दिला की, पाकिस्तानला नकाशावर दिसायचे असेल तर त्यांना दहशतवाद्यांना मदत करणे थांबवावे लागेल. द्विवेदी म्हणाले, पाकिस्तानने दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवले नाही तर ते नकाशावरून कायमचे पुसले जाऊ शकतात. भारतीय लष्कर पाकिस्तानविरुद्ध संयमाची भूमिका घेणार नाही. पाकिस्तानने दहशतवाद थांबवला नाही तर भारत ऑपरेशन सिंदूरचा दुसरा टप्पा सुरू करेल. ऑपरेशन सिंदूर १.० दरम्यान भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. या कारवाईत अनेक पाकिस्तानी जवान व अनेक दहशतवादी मारले गेले होते. ऑपरेशन शिंदुर यशस्वी झाले आहे. या बाबत पाकिस्तानची प्रक्रिया आम्ही जिंकलो अशीच आहे. त्यामुळे पाकिस्तान हा सुधारणारा देश नाही. दरवर्षी पाकिस्तानला वटणीवर आणण्यासाठी लाखोंचा खर्च होत आहे. आज पर्यंत किती पैसा भारताचा वाया गेला असेल. त्यामुळे काय ते एकदाचा प्रश्न निकाली लावला पाहिजे. सतत पाकिस्तानला वटणीवर आणणे शक्य नाही. विकासाचा पैसा, या ना-लायक बाबीवर खर्च होत असेल तर काय तो एकदाचा कायम स्वरूपी निर्णय घेतला पाहिजे. मुळात पाकिस्तान हा नवा देश निर्माण करणे ही भारताची मोठी चुक समजली जाते. त्याच वेळी समजुतदारपना चरखावाल्यांनी घेतला असता तर आज ही डोकेदुखी ठरली नसती. मुळात युद्ध करणे कोणालाही परवडणारो नाही. आलिकडील व पुर्वीचे युद्ध यात मोठा फरक आहे. आता जीवित व वित्त हानी मोठी होते. त्यात शत्रुराष्ट्र डाव साधुन घेतात. त्यामुळे अजूनही पाकिस्तानला काही बाब समजून येत नाहीत. भारताला मित्र माणून विकास साधला पाहिजे. हिंसा हे प्रतित्तर नाही. हे लक्षात येत नाही. त्यामुळे आता संयम संपत आला असून काय तो एकदाचा कायम स्वरूपी निर्णयाची गरज आहे. अखंड भारत देश हा पेटून उठला पाहिजे. दरवर्षी भारत-पाक दरम्यान लाखोंचा खर्च सुरक्षतेवर खर्च होत आहे. यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. त्यामुळे आता काय ते एकदाचे ऑपरेशन करून पोस्टमार्टम केले पाहिजे तरच तो वटणीवर येवु शकेल. नसता पाकिस्तान हा भारताला सुखाने जगू देणारा देश नाही. बहुसंख्या त्यांच्या समाजाची वाढती संख्या व वाढता पाठींबा मिळत असल्याने पहलगाम सारखा हल्ला यशस्वी होतो. यापुर्वी ही अतिरेकी घुसून अनेकांचा जीव घेतला आहे. अनेक जवान शहीद झाले आहेत. त्यामुळे सर्व भारतीयांनी भारत सरकारला पाठींबा देवुन पाकिस्तानचा काय तो एकदाचा निर्णय घेणे अपेक्षित आहे. नसता एक ना एक दिवस भारताला मोठी किंमत मोजावी लागणार आहे. जगातील कांही बाबीचा विचार केला तर भारताला धाडसाने काही पावले उचलण्याची गरज आह. त्यामुळे भारताला काय तो कायमचा निर्णय घेणे उचित ठरणारा आहे.

# विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेमध्ये दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीला मिळाली एकूण ११ पारितोषिके



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व दयानंद वाणिज्य महाविद्यालय,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.४ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार - २०२६ स्पर्धेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीला एकूण ११ पारितोषिके मिळाली.या स्पर्धेत विद्यापीठाशी संलग्नित लातूर जिल्ह्यातील १९ महाविद्यालयांचा व ३०६ स्पर्धकांचा सहभाग होता.एकूण स्पर्धकां पैकी ४४ विजेते निवडायचे होते.त्यातील ११ विजेते हे एकट्या दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचे आहेत हि अभिमानास्पद बाब आहे.या स्पर्धेतील हे यशस्वी विजेते पुढील स्पर्धेत स्वा. रा.ती.म.वि.,नांदेड चे प्रतिनिधत्व करणार आहेत.

महाविद्यालयाच्या फार्मसी विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त पणे भाग घेऊन विविध श्रेणीत यशस्वी रित्या आपापले संशोधन प्रकल्प तज्ञां समोर सादर केले.पदवी गटातून मसूलदार नुजत (ॲग्रीकल्चर अँड ॲनिमल हजबंड्री)प्रथम,तनुजा मोरे (मेडिसिन अँड फार्मसी)प्रथम,वैष्णवी शुक्ला (ॲग्रीकल्चर अँड ॲनिमल हजबंड्री) द्वितीय,गोरे ऋतुजा (इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजि) तृतीय या विषयांवर प्रकल्प सादरीकरण करून पारितोषिक पटकावले. पदव्युत्तर गटातून होनराव प्रकाश(ॲग्रीकल्चर अँड ॲनिमल हजबंड्री) द्वितीय,पोतदार सोनाली (ह्युमॅनिटीज लँग्वेज अँड फाइन आर्ट)द्वितीय,पाटील मयुरी (इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजि)द्वितीय,राजमाने वैभवी (ह्युमॅनिटीज लँग्वेज अँड फाइन आर्ट) द्वितीय,गायकवाड रोहित (प्युअर सायन्सेस) द्वितीय पारितोषिक पटकावले तर पीपीजी गटातून प्रा.राख लिंबराज यांनी (ॲग्रीकल्चर अँड ॲनिमल हजबंड्री) या विषयांवर प्रकल्प सादरीकरण करून प्रथम तर प्रा.साबणे अंजली यांनी (ह्युमॅनिटीज लँग्वेज अँड फाइन आर्ट) द्वितीय पारितोषिक पटकावले आहे.संघ व्यवस्थापक म्हणून डॉ.अर्चना येलमटे यांनी काम पहिले. यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ.क्रांती सातपुते, डॉ.अर्चना येलमटे, डॉ.अजय गडगूळ, डॉ.बालाजी शेटकार, प्रा.नरेश हलके यांचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेतील या विजेत्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदरावजी सोनवणे, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व महाविद्यालयीन प्राद्यापक वृंद यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

# अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रम!

# औद्योगिक प्रशिक्षण संस्था आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्य आणि उद्योजकता केंद्र म्हणून विकसित होणार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग सज्ज आहे. कुशल मनुष्यबळ हे देशाच्या विकासात मोठे योगदान देत असते. सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण देणे, देशातील उद्योग तसेच आवश्यक त्या क्षेत्राला अनुसरून गरजेनुसार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित करणे, युवक-युवतींचे विकसित माहिती तंत्रज्ञानासह ज्ञान अद्ययावत करणे, काळाच्या मागणीनुसार शिक्षण धोरण तयार करणे, केंद्र आणि राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागातंर्गत येणाऱ्या सर्व योजना तसेच शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाच्या योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे.



राज्यात कौशल्य विकासाच्या योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात आहेत. राज्यातील युवक, युवतींना अधिकाधिक चांगल्या प्रशिक्षणानंतर रोजगार प्राप्त व्हावा यासाठी कौशल्य रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचा पदभार घेतल्यापासून विविध निर्णय व योजना राज्यात सुरू करण्यात आल्या असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्राला देशाचे कौशल्य केंद्र म्हणून विकसित करणे ध्येय आहे. आयटीआय हा एक उच्च कौशल्य गुणवत्ता ब्रँड म्हणून प्रस्थापित करून औद्योगिक आस्थापनांच्या सहयोगाने प्रशिक्षण व प्रशिक्षण सुविधा वाढविणे, प्रतिवर्षी पाच लाख युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, स्थानिक पारंपारिक कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणे, यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने कौशल्य अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील युवकांना कौशल्याधारित रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २,५०६ तुकड्यांच्या ''अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे'' उद्घाटन लवकरच ऑनलाईनच्या माध्यमातून होणार आहे.

### प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश

अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे उमेदवारांना त्यांच्या आवडीचा अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. ''प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश'' या तत्त्वावर प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार असून, इच्छुक उमेदवारांना गावात किंवा शहरात जवळच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेता येईल.

### जनतेच्या सूचनांनुसार रोजगाराभिमुख अभ्यासक्रम

या योजनेत जनतेलाही सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे. नागरिक आपल्या परिसरात कोणते रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू व्हावेत हे सुचवू शकतात आणि शासन त्यांच्या सूचनांचा अभ्यास करून त्या अभ्यासक्रमांचा देखील समावेश या योजनेत करणार आहे. यामुळे स्थानिक रोजगाराच्या गरजेनुसार प्रशिक्षण देण्यास मदत होईल.

### अल्पमुदतीचे अभ्यासक्रम

या उपक्रमांतर्गत तीन महिन्यांच्या कालावधीचे अल्पमुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहेत. हे अभ्यासक्रम तरुणांना अल्पावधीत रोजगारक्षम बनविण्यासाठी तयार करण्यात आले असून, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन त्यांचे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

### प्रशिक्षणासोबत स्थानिकांचा सहभाग

या कार्यक्रमांतर्गत कार्यक्रमाच्या उद्घाटनादिवशी प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर स्थानिक दोन हजार नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. प्रशिक्षणार्थ्यांसोबत स्थानिक युवक, पालक आणि समाजातील विविध घटकांचा सहभाग सुनिश्चित करून या कार्यक्रमाला जनसहभागाचे रूप देण्यात येत आहे.

### सेवानिवृत्त शिक्षकांचा सामाजिक सहभाग

अल्पमुदतीचे हे अभ्यासक्रम शिकविण्यासाठी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासकीय तंत्रनिकेतनांमधील सेवानिवृत्त शिक्षकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. हे शिक्षक आपले अनुभव, ज्ञान आणि तांत्रिक कौशल्य समाजासाठी वापरणार असून, सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून शासनाच्या या उपक्रमात योगदान देतील. यामुळे प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढेल आणि विद्यार्थ्यांना अनुभवी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मिळेल.

### अभ्यासक्रमाची उपयुक्तता

या योजनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांना एकसमान संधी मिळणार आहे. स्थानिक केंद्रांमधूनच हे प्रशिक्षण उपलब्ध असल्यामुळे प्रवासाचा अडथळा दूर होईल. तसेच महिला उमेदवार, स्वयंरोजगार इच्छुक युवक आणि नव्या तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी हे अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

### लोकसहभागातून घडणार कौशल्य क्रांती

या उपक्रमाचा उद्देश फक्त प्रशिक्षण देणे नसून, राज्यभरात कौशल्य विकासाची नवी चळवळ उभी करणे हा आहे. शासन, उद्योग, शिक्षक आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नातून ''रोजगारक्षम महाराष्ट्र'' घडविण्याचा संकल्प या योजनेतून पुढे येत आहे.

### आयटीआयचा सर्वांगीण विकास

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आयटीआय) दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यांना उद्योगजगताशी अधिक सक्षमपणे जोडण्यासाठी संस्था व्यवस्थापन समित्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक सुधारणा सुरू आहेत. या सर्व उपक्रमासाठी संस्था व्यवस्थापन समिती प्रशिक्षक देणार आहेत. तसेच ही समिती प्रमुख म्हणून व्यवस्थापन करणार आहे. तेच मेंटर प्रशिक्षक निवडणार. अभ्यासक्रमसुद्धा स्थानिक परिस्थितीत व गरजेनुसार निवडले जाणार आहे. या समित्यांमध्ये स्थानिक उद्योग प्रतिनिधी, शैक्षणिक तज्ज्ञ, प्रशिक्षण अधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी सहभागी असतात. समितीमार्फत प्रत्येक संस्थेच्या गरजेनुसार प्रशिक्षणाचा दर्जा, पायाभूत सुविधा, उपकरणांचे आधुनिकीकरण आणि अभ्यासक्रमांची उद्योगाभिमुख पुनर्रचना यावर भर दिला जात आहे.

राज्य शासनाने यासाठी ''संस्थात्मक स्वायत्तता आणि उत्तरदायित्व'' या तत्त्वावर आधारित धोरण राबवले असून, प्रत्येक आयटीआयला स्थानिक उद्योगांसोबत सामंजस्य करार करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.

या माध्यमातून संस्थांना आधुनिक उपकरणे आणि प्रयोगशाळा विकसित करणे, प्रशिक्षकांसाठी कौशल्यवर्धन कार्यशाळा आयोजित करणे, विद्यार्थ्यांसाठी उद्योगांतील ऑन-द-जॉब ट्रेनिंग आणि ॲप्रेंटशीप संधी निर्माण करणे, तसेच संस्थेच्या परिसरात स्मार्ट क्लासरूम, डिजिटल लर्निंग लॅब्स आणि ग्रीन कॅम्पस संकल्पना राबविणे, असे विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.

संस्था व्यवस्थापन समितीमार्फत प्रत्येक आयटीआयचे वार्षिक कार्य योजनानुसार पुनरावलोकन केले जाते. त्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती, प्रशिक्षणाची गुणवत्ता, परीक्षेतील निकाल आणि उद्योगांत नोकरी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण यांचा नियमित आढावा घेतला जातो. या प्रयत्नांमुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्था आता केवळ पारंपरिक व्यवसाय शिक्षणापुरत्या मर्यादित न राहता, आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्य आणि उद्योजकता केंद्र म्हणून विकसित होत आहेत.

**- मंगल प्रभात लोढा**
**मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालय, महाराष्ट्र शासन.**

# ज्येष्ठ गांधीवादी नेते जी. जी. पारीख यांना लातुरात समाजवाद्यांची श्रद्धांजली! सुनीता आरळीकर, शिवाजीराव शिंदे यांनी जी. जी. सोबतच्या आठवणींना दिला उजाळा



**लातूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ गांधीवादी, समाजवादी नेते जी. जी. पारीख यांचे गांधी जयंती दिनी २ ऑक्टोबरला निधन झाले. त्यानिमित्त रविवारी ५ ऑक्टोबर रोजी लातूर येथील बाबासाहेब परांजपे वाचनालयात समाजवादी व समविचारी संघटनानी जी. जी. पारिख यांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी ज्येष्ठ समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे, सामाजिक कार्यकर्त्यांनी सुनीता आरळीकर, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांनी आपल्या मनोगतात जी. जी. पारिख यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा देऊन आजच्या अघोषित आणीबाणीच्या स्थितीत सर्व पुरोगामी, समाजवादी संघटनानी एकत्रित येणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. .तर प्रा. अशोक नारवरे, विश्वभर भोसले, प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड,, प्रा. सुधीर अनवले, रामराजे आत्राम, शिवाजीराव नरहरे, डॉ.रब्बानी शेख, डॉ. अनिल जायभाये, डॉ. गणेश गोमारे, शाम जैन आदींनी आपल्या मनोगतात जी. जी. पारिख यांच्याबद्दल माहिती देऊन श्रद्धांजली वाहिली. यावेळी सूर्यप्रकाश धूत, दिलीप आरळीकर, डॉ. निशिकांत वारभुवन, उतरेश्वर बिराजदार, डी. उमाकांत, शिवाजी कांबळे, आर. यू. भिकाणे, अंजीर पवार आदींची उपस्थिती होती.


# पालकमंत्र्यांसमवेत सुरज पाटलांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी : देवेंग्रावाडी ग्रामस्थांना दिला दिलासा



**चाकूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या समवेत शिरूर ताजबंद चे उपसरपंच तथा युवा नेते सुरज बाबासाहेब पाटील यांनी चाकूर तालुक्यातील देवांग्रावाडी, तसेच मुरंबी ते महाळग्रावाडी येथे नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. या पाहणीत पालकमंत्री ना. भोसले यांना या भागाचे प्रचंड नुकसान झाले आहे, पुलाचे मोठे प्रमाणात नुकसान झाले आहेत. पुल वाहून गेला आहे. या पुलाची तात्काळ दुरुस्ती करणे गरजेचे आहे तसेच विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी तात्पुरती व्यवस्था करणे गरजेचे असल्याची निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ प्रशासनाला सांगितले कि, पुलाची दुरुस्ती कराच परंतु सद्यस्थितीत तात्काळ या भागात विद्यार्थी,शेतकऱ्यांना येण्या जाण्यासाठी तातपूर्ती व्यवस्था करण्याचे निर्देश सुद्धा पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी सुरज पाटील यांच्या समवेत महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव, माजी मंत्री तथा आ. संजय बनसोडे,जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल मीना,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, चाकूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक यशवंतराव, जाधव, भानुदासराव पोटे, दयानंद राव सुरवसे,अनिलजी वाडकर, सोपानराव मनाळे, नामदेव शिंदे,मोहनराव जाधव हनुमंतराव लवटे पाटील,राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष संदीप शेटे विवेक शिंदे, शहराध्यक्ष बिलाल पठाण सह तालुक्यातील विविध प्रशासकीय अधिकारी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे व महायुतीचे विविध नेते उपस्थित होते.

# जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात अभिजात मराठी दिन साजरा




**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव व जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमान जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात दि. ०३/१०/२०२५ रोजी अभिजात मराठी दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे म्हणून श्रीमती कांचन जाधव (माळी) नायब तहसिलदार धाराशिव, माळी निलेश हणमंत निरीक्षक अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र शासन मुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त विजय गायकवाड, ॲड. अजित कांबळे, श्रीमती काशीद मॅडम हे होते.

यावेळी प्रमुख पाहूण्या श्रीमती कांचन जाधव यांनी ग्रंथ प्रदर्शनाचे फित कापूर उद्घाटन केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, केंद्र शासनाने मराठी भाषेस अभिजात दर्जा दिल्यामुळे मराठी भाषेचा सन्मान झाला आहे. यामुळे युवकांसाठी सर्वांसाठी मराठी भाषेचे नवे दालन खुले झाले आहे. पुढील काळात आपण सर्वांनी मराठी भाषा विकसित होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल्ल राठोड यांनी केले.

यावेळी प्रमोद जगताप, शाम भणगे, उमेश इंगळे, कोळगे, एम.पी.एस.सी, यु.पी.एस.सी परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, वाचक उपस्थित होते.

# अजाणांच्या ओठी



भारतात सर्वात जास्त दुर्लक्ष केले जात असेल तर ते मुलांच्या आरोग्याकडे. त्यातही सरकारी संस्था असतील तर या दुर्लक्षाचे परिणाम फारच भयंकर होतात. देशात एकूणच आरोग्यावर सरकार केवळ वित्त वर्ष २०२६ च्या अर्थसंकल्पानुसार २ टक्के खर्च करते. ही आकडेवारी केवळ २०२६ ची आहे. त्यापूर्वी कितीतरी लोकांनी सरकारच्या आरोग्यावरील अपुऱ्या उपाययोजनेमुळे आपले प्राण गमावले असतील त्याची कल्पना करणे अशक्य आहे. पण काल मध्य प्रदेशमध्ये ९ आणि राजस्थानात २ जणांचा बळी याच कफ सिरपमुळे गेला आणि त्यानंतर सरकारी यंत्रणा खडबडून जागी झाली. मग कोल्ड्रिफ या कफ सिरपवर बंदी आणली गेली आणि हे विषारी किंवा कंटॅमिनेटेड कफ सिरपचे जाळे केवळ मध्य प्रदेश अथवा राजस्थानमध्येच नव्हते, तर त्याची व्याप्ती तामिळनाडूतही पसरली आहे असे लक्षात आले. या कोल्ड्रिफमध्ये डाय इथिलीन ग्लायकोल हा विषारी पदार्थ अत्यंत धोकादायक अवस्थेत आढळला. ज्याचे प्रमाण ४८.६ टक्के इतके होते. सहसा कोणत्याही कफ सिरपमध्ये या घातक पदार्थाचे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेकडून केवळ ०.१० टक्के इतके असण्यास मान्यता आहे. इतक्या जास्त प्रमाणात या पदार्थाची कफ सिरपमध्ये उपस्थिती ही त्याच्या घातकपणाची साक्ष आहे पण ते औषध देणाऱ्या डॉक्टर्सची कंपन्यांशी असलेली साठगाठ दाखवून देणारी आहे. आता केंद्र सरकार आणि मध्य प्रदेश सरकारने डॉक्टरांसाठी सल्लापत्र जारी केले आहे, की त्यांनी दोन वर्षांखालील मुलांसाठी तरी हे कफ सिरप आपल्या औषध योजनेत देऊ नये. पण हे उशिरा आलेले शहाणपण झाले. त्या आधी जी अकरा बालके दगावली त्यांच्या जिवांची कोण जबाबदारी घेणार हा प्रश्न तसाच आहे. जी मुले या प्रकरणात दगावली आहे, ती गरीब किंवा मध्यमवर्गीय परिवारांतील आहे. त्यांच्या आईवडिलांकडे यंत्रणेला जाब विचारण्याची क्षमता नाही. त्यामुळे या असहाय्य आईवडिलांनी आपल्या मुलांच्या यमदूताकडे म्हणजे डॉक्टरांच्या कृत्यांकडे असहाय्यपणे पाहत बसावे का, असा प्रश्न उरतो. औषध तयार करणाऱ्यांनी आपल्या नैतिकतेशी तडजोड करत ही विषारी द्रव्य असलेली कफ सिरप विकली आहे. यंत्रणेविरोधात दाद मागण्याची सामान्य माणसात ताकद नसतेच त्यामुळे हे प्रकार चालतात. काही दिवस हे गाजेल आणि नंतर बासनात गुडांळून ठेवले जाईल. कफ सिरपमध्ये डाय इथिलीन ग्लायकोलचे प्रमाण असल्याची पुष्टी केली आहे. पण तामिळनाडूमधील उत्पादक कंपनीला इतक्या प्रमाणात हा विषारी पदार्थ वापरण्याची परवानगी कुणी व का दिली हा यातील महत्त्वाचा मुद्दा आहे. मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील सहा आणि राजस्थानातील दोन बालके या कफ सिरपमुळे दगावली. याला सरकारी यंत्रणा जबाबदार आहे, यात काही शंका नाही. भाजपची सरकारे असलेल्या राज्यात हे प्रकार झाल्याने तेथील यंत्रणा दोषी आहे, असा दावा कुणी केला तर त्यासारखे हास्यास्पद तोच असेल. पण या प्रकरणाची निष्पक्षपाती चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करायला हवी. आरोग्य मंत्रालयानेही पुष्टी केली आहे, की त्यांच्या तामिळनाडूमध्ये असलेल्या कोल्ड्रिफ या कफ सिरपमध्ये डाय इथिलीन ग्लायकोलचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दोन वर्षांच्या आतील बालके या औषधामुळे दगावली आहे. पण केंद्र सरकारच्या चाचणीत असे आढळले आहे, की कोणतेही दूषित पदार्थ कफ सिरपमध्ये आढळला नाही. सीडीसीएसओने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे, की कोणत्याही कफ सिरपमध्ये असा कोणताही दूषित पदार्थ आढळला नाही. असे असले तरीही या ११ मुलांच्या मृत्यूची जबाबदारी कोणत्याही सरकारला टाळता येणार नाही. केंद्र सरकारने कफ सिरपला क्लीन चिट दिले असले, तरीही त्यामुळे लहान मुलांचे मृत्यू झाले हे सत्य नाकारता येणारे नाही. केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशांना कफ सिरपचा वापर करू नये म्हणून कडक आदेश दिले. राज्यांनी या विषयावर जी सतर्कता दाखवली आहे ती कौतुकास्पद आहे. कफ सिरपच्या उत्पादनावर हिमाचलमध्ये बंदी आणली आहे आणि तामिळनाडूत तर बंदी आहे. आपल्याकडे कफ सिरप अगोदर निरूपद्रवी औषध म्हणून उपयोगात आणले जात होते पण त्यानंतर झोपडपट्टीतील मुलांनी आणि कित्येक तरुणांनीही कफ सिरपचा मादक पदार्थ म्हणून वापर सुरू केला होता. त्यामुळेच त्याच्यावर आधीच बंदी होती.सहा राज्यांत या कफ सिरपचे निरीक्षण करण्यात आले आणि त्यात दूषित पदार्थाचे प्रमाण वाजवीपेक्षा जास्त आढळले आहे. कफ सिरप हे फक्त खोकल्यावर दिले जाते आणि त्याचा उपयोग पुढे तरुणांकडून नशेसाठी केला जाऊ लागला. पण आता तर हे लहान मुलांचे बळी घेणारे ठरले आहे आणि ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे सरकारने जागरूक होऊन कफ सिरपच्या वापरावरच बंदी आणली आहे. कफ सिरपच्या वापरामुळे लोकांना विशेषतः बालकांना उच्च रक्तदाब, अनियमित हृदयाचे ठोके आणि मानसिक तसेच अस्वस्थ वाटणे असे परिणाम संभवतात. लहान बालके हे सांगू शकत नाही. त्यामुळे कित्येक तर मृत्यूला कवटाळतात. कधी-कधी या निरूपद्रवी वाटणाऱ्या कफ सिरपचे परिणाम भयंकर ठरतात. त्यामुळे आता सरकारने जी कृती केली आहे ती अत्यंत स्वीकारार्ह आणि योग्य आहे. तसेच कोरड्या खोकल्यासाठी कफ सिरप डॉक्टर लिहून देत असत. पण आता केंद्र सरकारने जारी केलेल्या सल्लापत्रामुळे तसे होणार नाही आणि यापुढे तरी बालके सुरक्षित राहतील अशी आशा बाळगण्यास जागा आहे. अन्न आणि औषध प्रशासन यांनी १८ किंवा त्यापेक्षा लहान मुलांसाठी कफ सिरप सुरक्षित नाही असे लिहून दिले आहे. पण तरीही आपल्याकडे नशा किंवा अन्य कारणांसाठी हे कफ सिरपचे सेवन केले जाते. आता या कफ सिरपवर कडक बंदी आणली पाहिजे. लहान मुले जी गेली आहे त्यांच्या आत्म्यांचा तळतळाट त्यामुळे आता तरी लागणार नाही. छिंदवाडातील मृत बालकांच्या मृत्यूंची संख्या १२ वर पोहोचली असताना कोल्ड्रिफचे बळी ते असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आता कोल्ड्रिफवर बंदी आली आहे, पण त्यांच्या शरिरांत विषारी पदार्थ असल्याचे आढळले आहे. ही निश्चितच भारताच्या आरोग्य क्षेत्रासाठी

# रोज खा आरोग्य वर्धक केळी



पिकलेली केळी आपल्या आहारामध्ये नेहमीच समाविष्ट असून, या फळाचे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने असणारे फायदे आपल्या परिचयाचे आहेत. पोटॅशियम आणि क्षार मुबलक असणारे हे फळ पचण्यास हलके आहे. याच्या सेवनाने शरीरामध्ये त्वरित उर्जा उत्पन्न होत असते. म्हणूनच व्यायामापूर्वी एखादे केळे खाण्याचा सल्ला आहारतज्ञ देत असतात. पिकलेल्या केळ्यांप्रमाणे कच्चे केळे देखील भाजी, भजी, कोफ्ते इत्यादी पदार्थ बनविण्याकरिता वापरले जात असते. पिकलेल्या केळ्यांप्रमाणेच कच्च्या केळ्याचे सेवनही आरोग्याच्या दृष्टीने अतिशय फायदेशीर म्हटले जाते. कच्च्या केळ्यांमध्ये फायबर आणि हेल्दी स्टार्च असून, ही तत्वे आतड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे ङ्कब्लॉकेजफ उत्पन्न होऊ देत नाहीत. त्याचमुळे ज्यांना बद्धकोष्ठाचा त्रास आहे, त्यांनी कच्च्या केळ्यांचा समावेश आहारामध्ये अवश्य करावा. ज्यांना मधुमेह आहे, किंवा ज्यांना मधुमेह असल्याचे नुकतेच निदान झाले आहे, त्यांच्यासाठी कच्च्या केळ्याचे सेवन फायदेशीर आहे. याच्या सेवनाने शरीरातील ब्लड-शुगरची पातळी नियंत्रणात राहते. कच्च्या केळ्यामध्ये फायबरची मात्र मुबलक असून, याच्या सेवनाने पोट अधिक काळ भरलेले राहते, व त्यामुळे वारंवार भूक लागण्याची भावना होत नाही. याच्या सेवनाने पचनक्रियाही उत्तम राहते. त्यामुळे ज्यांना वारंवार अपचनाचा त्रास होतो, त्यांनी आपल्या आहारामध्ये कच्च्या केळयाचा समावेश अवश्य करावा.

# मन करारे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण



एक खूप प्राचीन कथा आहे. श्वेतकी नावाचा एक राजा होता. तो खूप यज्ञ करत असे. त्यामुळे त्याची खूप ख्याती झाली होती. त्याने एकदा सलग बारा वर्षे अग्नीदेवाला अखंड शुद्ध तुपाची आहुती दिल्याने अग्नी देवाची पाचनशक्ती वाढली. याचा वाईट परिणाम असा झाला, की अग्नीदेवतेचे तेज कमी झाले आणि तो मंद पडला मग त्याने ब्रह्मदेवाकडे धाव घेतली आणि त्यांना तेज परत मिळविण्याचा मार्ग विचारला. तेव्हा ब्रह्मदेवाने त्याला खांडव येथील जंगल जाळून टाकण्याचा सल्ला दिला. त्याने तसे केले, परंतु इंद्रदेवाने पाणी टाकून ती आग विझवली. मग त्याने कृष्ण आणि अर्जुनाला आपल्या साह्यतेचे आवाहन केले. अर्जुनाने अग्नी देवाला विनंती केली, की मला देवेंद्राशी युद्ध करण्यासाठी तू शस्त्रे पुरवायची. अग्नी देवाने त्याला गांडीव धनुष्य आणि दिव्यास्त्र दिले, तर कृष्णाला एक चक्र भेट दिले. यानंतर अग्नी देवाने आपल्या शक्तीद्वारे पुन्हा खांडव जंगल जाळण्यास सुरुवात केली. वाढत्या आगीने पृथ्वीवर मात्र परत हाहाकार माजला. त्यावर देवेंद्राने आपल्या शक्तीने पाऊस पाडण्यास सुरुवात केली, परंतु अर्जुन आणि कृष्णाने पावसाला रोखले. यावेळी इंद्राच्या मदतीला देव, असुर, यक्ष, राक्षस, सर्प असे अनेक जण धावून आले, परंतु या साऱ्यांचा कृष्ण आणि अर्जुनापुढे निभाव लागला नाही. अखेर अग्नी देवतेने आपली आग पसरवल्याने त्यांची तब्बेत पूर्ववत झाली. आणि त्यांच्या चेहऱ्यावर तेज परतले. तात्पर्य इतकेच की, जर शरीर सुखी असेल, तर मनही प्रसन्न राहते. आणि मन प्रसन्न तर चेहऱ्यावर आपोआप तेज दिसते.

तुम्हाला ताजेतवाने दिसायचे असेल तर तुम्हाला आपले शरीर तर स्वस्थ ठेवायलाच हवे. परंतु, याच सोबत आपले मनही प्रसन्न ठेवणे गरजेचे आहे.

# या लोकांनी चुकूनही खाऊ नका पेरू, आरोग्याच्या समस्या वाढतील

पेरू हे अतिशय पौष्टिक आणि चविष्ट फळ आहे, अनेकांना ते खायला आवडते. विशेषत: ज्यांची पचनक्रिया कमजोर आहे त्यांच्यासाठी हे आयुर्वेदिक औषधापेक्षा कमी नाही. तर मात्र काहींसाठी हे फळ घातक ठरू शकते. या फळामध्ये व्हिटॅमिन बी ६, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, फायबर, पोटॅशियम, फॉस्फरस, कॅल्शियम, लोह, झिंक, कॉपर, कार्बोहायड्रेट, अँटी-डायबेटिक, डायरियाल, अँटीमायक्रोबियल आणि अँटीफंगल गुणधर्म आढळतात. इतके पोषक तत्व असूनही हे फळ प्रत्येकासाठी फायदेशीर नाही. चला जाणून घेऊया कोणत्या लोकांनी पेरू खाणे टाळावे.



पेरूचा कूलिंग इफेक्ट असतो, त्यामुळे ज्यांना सर्दी, खोकला यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो अशा लोकांनी पेरूचे सेवन अजिबात करू नये, कारण नंतर तुम्हाला बरे होण्यासाठी बराच वेळ लागेल.


एक्जिमाचा सामना करणार्यांनी पेरू खाऊ नयेत, कारण याच्या सेवनाने त्वचेवर जळजळ आणि खाज येऊ शकते. अशा परिस्थितीत पेरूची पानेही खाऊ नयेत.

पेरू आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे, परंतु ज्या लोकांना गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्यांचा सामना करावा लागतो त्यांनी या फळापासून दूर राहावे कारण यामुळे पोटदुखी आणि उलट्या होऊ शकतात.

गरोदर महिला आणि स्तनपान करणाऱ्या मातांनी पेरूपासून दूर राहावे. हे तिच्या आणि मुलाच्या आरोग्यास हानी पोहोचवू शकते.

जर तुमचे कोणतेही ऑपरेशन किंवा शस्त्रक्रिया होणार असेल तर तुम्ही २ आठवडे अगोदर पेरू खाणे थांबवावे, कारण या फळाच्या सेवनाने रक्ताभिसरणात समस्या निर्माण होऊ शकतात. (क्शरश्रींह) डिस्क्लेमर - वरील लेख माहितीवर आधारलेला असून अधिक माहितीसाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

## डॉक्टर टीप्स



### बुद्धी तल्लख होण्यासाठी आपल्या आहारात करा हे पदार्थ समाविष्ट



ज्स्ट्रॉबेरी, करवंदे, रास्पबेरी या सारख्या फळांमध्ये फायटोकेमिकल्स मुबलक मात्रेमध्ये असतात. ही बुद्धीवर्धक असून, स्मरणशक्ती तल्लख ठेवणारी आहेत. ब्रोकोलीमध्ये असणारे सल्फोराफेन हे तत्व मेंदूची शिथिलता दूर करण्यास सहायक आहे. यामध्ये असलेले फोलिक अ‍ॅसिड मेंदू सक्रीय राहण्यास मदत करणारे असून, त्यामुळे अल्झायमर्स सारख्या व्याधींचा धोका पुष्कळ अंशी कमी होतो.भोपळ्याच्या बियांमध्ये झिंक मुबलक मात्रेमध्ये असून, हा क्षार बुद्धीवर्धक आणि स्मरणशक्ती तल्लख करणारा आहे. त्याशिवाय यामध्ये असणारे मॅग्नेशियम, ब जीवनसत्वे, ही देखील मेंदूच्या आरोग्यास पूरक आहेत.बीटामध्ये मुबलक प्रमाणात असलेल्या नायट्रेटस मुळे मेंदूला होणारा रक्तप्रवाह चांगला राहतो. त्यामुळे बीटाचे सेवनही बुद्धीवर्धक मानले गेले आहे. **(क्रमशः)**





## विनोद


**अमित : आई आई, आज आम्हाला लिहायला शिकवले.**
**आई : काय लिहिलेस?**
**अमित : अजून आम्हाला वाचायला नाही शिकवले.**

## संदेश

Santa apne bete ko: is baar agar exam mein fail huaa, to mujhe pitaji mat bulaana.
kuch din ke baad,
Santa: result ka kya hua?
Santa ka beta: sorry santa


## सुविचार

शिहाणे लोक कोणावरही विश्वास ठेवत नाहीत.
**-टॅसिटस**



**संस्कृत सुभाषित**
**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफल हेतूर्भूमातेसंगोस्त्व कर्मणि ।। (भगवद्गीता)**
**अर्थ** - तू फक्त कर्माचा अधिकारी आहेस, कर्म करणे हेच तुझ्या हाती आहे. त्या कर्मातून फळाची अपेक्षा धरू नको. फळ मिळो वा न मिळो, तुला कर्म केलेच पाहिजे आणि फळ मिळत नाही म्हणून कर्मच न करण्याची इच्छा तू बाळगू नको. तू कर्म करीतच रहा.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. कातीव दगड
३. नेहमी पटकन विसरणारा
६. वाडवडील
१०. आरडाओरडा, दंगा
१२. दोस्त
१३. व्याह्यांची बायको
१४. अयोध्येची नदी
१६. दाट, निबीड
१८. पृथ्वी
२०. उत्साह
२१. हे खाऊन रूप येते का?
२३. किडा
२५. वाईट सवय
२७. अस्थी
२९. अंत:करण
३१. पराक्रमी पुरुष
३२. आदरणीय
३३. दरवाजा
३५. कापड इ.चा पृष्ठभाग
३६. तृण
३८. आच, उष्णता
३९. घर
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा
४१. वरणाची दाळ
४२. निर्दय
४३. उद्यान
४४. जवळीक, मैत्री
४७. स्वीकृत, अंगीकृत
५०. अप्रिय, न आवडणारा
५१. सुळका
५१अ. अफवा, वदंता
५२. बालीश
५४. भगिनी
५५. पुष्कळ
५७. तंग
५८. क्रीडा
५९. वेखंड
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ
६१. बाण
६३. बंध
६४. विलंब
६५. टिंगल
६६. कायद्याला या हजार असतात!
६९. चकित नजर
७१. लाह्यांचा होम
७४. बासरी
७५. चुलता
७७. उणे
७८. न टाळण्याजोगे
७९. बरोबरीचा
८०. शर्विलक
८१. झेप
८३. घोडा
८४. पुष्पगुच्छ
८५. खेळातील चाल
८६. आईचा भाऊ
८७. गगन
८८. रहायला घर नसलेला

### उभे शब्द

१. दिवा (हिंदी)
२. वेडावाकडा
४. यज्ञातील सरपण
५. निशा
६. अस्तनी
७. नातवंडाचा मुलगा
८. राष्ट्र
९. वारा
१०. डिंक
११. ताजे, तरतरीत
१३. स्वच्छ, निर्मळ
१५. रूधिर
१७. फांदी
१९. सेपे
२२. डोंगर
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक
२६. धीर, बळ, उत्साह
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे
२९. बंदुकीची गोळी
३०. विश्व
३४. गंध, परिमळ
३५. एक 'बोलका' पक्षी
३७. रंग
३८. अटकसत्र
३९. कोडगा
४०. संसद सदस्य
४३. वक्रता
४५. मीठ
४६. वार्धक्य
४८. भेग
४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा
४९. आगेकूच
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'
५२. पोळ्या करण्याचे साधन
५३. मिठी
५४. नोकर
५७. गृह
६१. लाज
६२. परिचय
६५. सूत कातण्याचे साधन
६७. आक्रोश
६८. हट्ट
७०. घट्ट दह्याची वडी
७२. अग्नी
७३. रगेल, माजखोर
७६. चोळीचा एक प्रकार
८१. पार्वती
८२. एक अप्सरा
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

### आडवे उत्तर

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

### उभे उत्तर

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हातारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### राहुल द्रविडचा धाकटा मुलगा चमकला



मुंबई,-भारतीय क्रिकेट संघाचा फलंदाज मयंक अग्रवाल आणि भारताचा माजी दिग्गज क्रिकेटपटू राहुल द्रविडचा मुलगा अन्वय द्रविडला कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनच्या (केएससीए) वार्षिक पुरस्कार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले आहे. १६ वर्षाखालील विजय मर्चंट ट्रॉफीमध्ये कर्नाटकसाठी सर्वाधिक धावा केल्याबद्दल अन्वय द्रविडला सलग दुसऱ्यांदा सन्मानित करण्यात आले. ४६ चौकार आणि २ षटकारांसह ९१.८० च्या सरासरीने दोन शतके ठोकली-
अन्वयने सहा सामन्यांमध्ये आठ डावांमध्ये ४५९ धावा केल्या, ४६ चौकार आणि २ षटकारांसह ९१.८० च्या सरासरीने दोन शतके देखील झळकावली. अन्वय द्रविडसह मयंक अग्रवाल आणि आर. स्मरन यांनाही पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. विजय हजारे ट्रॉफीमध्ये कर्नाटकचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून मयंक अग्रवालला हा पुरस्कार मिळाला. मयंक अग्रवालने ९३ च्या सरासरीने ६५१ धावा केल्या.

***

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले भारतीय पॅरा-ॲथलीट खेळाडूंच्या चमूचे कौतुक



नवी दिल्ली-नवी दिल्ली इथे आयोजित जागतिक पॅरा-ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत भारताच्या दिव्यांग खेळाडूंनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज भारतीय पॅरा-ॲथलीट खेळाडूंच्या चमूचे कौतुक केले. या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी ६ सुवर्ण पदकांसह २२ पदके जिंकून, या स्पर्धेच्या पदकतालिकेतील भारताच्या आतापर्यतच्या सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली. त्यांच्या या कामगिरीने देशाच्या पॅरा-क्रीडा प्रवासातील एक नवीन टप्पा गाठला गेला आहे. भारताने पहिल्यांदाच या प्रतिष्ठित जागतिक स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल अभिमान वाटत असल्याची भावनाही पंतप्रधानांनी व्यक्त केली आहे.यासंदर्भात एक्स या समाज माध्यमावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिलेला संदेश :आपल्या पॅरा-ॲथलीट्सची ऐतिहासिक कामगिरी!यावर्षीची जागतिक पॅरा-ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप खूपच खास होती.

***

### देशाला वर्ल्ड कप जिंकवून देणाऱ्या दिग्गज क्रिकेटरचा अचानक मृत्यू



दिल्ली-क्रिकेट हा जगातील लोकप्रिय खेळांपैकी एक असून हा आंतरराष्ट्रीय खेळ खेळणाऱ्या क्रिकेटपटूंना सुद्धा मोठी लोकप्रियता मिळते त्यांच्या फॅन फॉलोईंगमध्ये वाढ होते. सोमवारी क्रिकेट जगतावर एका दिग्गज क्रिकेटरच्या निधनाच्या बातमीने शोककळा पसरली. १९७५ च्या वर्ल्ड कप विजेत्या संघाचा महत्त्वाचा भाग असलेले वेस्ट इंडिजचे माजी अष्टपैलू बर्नार्ड ज्युलियन यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. बर्नार्ड ज्युलियनने २४ टेस्ट आणि१२ वनडे सामन्यांमध्ये वेस्ट इंडिजचे प्रतिनिधित्व केले होते. बर्नार्ड ज्युलियन हे १९७५ च्या चॅम्पियन वेस्ट इंडिज संघाचा एक महत्त्वाचा भाग होते, ज्यांनी पाच सामन्यांमध्ये १७.७० च्या सरासरीने १० विकेट्स घेतल्या होत्या. त्या वर्ल्ड कपमध्ये श्रीलंकेविरुद्ध बर्नार्ड ज्युलियनने २० धावा देत ४ विकेट घेतले. त्यानंतर त्याने पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध प्रत्येकी १ विकेट घेतला.

***

### विराटसोबत वर्ल्ड चॅम्पियन झालेल्या खेळाडूंना ओळखलेत का?

मुंबई-२००८ साली टीम इंडियाने अंडर-१९ वर्ल्ड कप जिंकला, तेव्हा जगाने विराट कोहलीला पहिल्यांदा पाहिले. १७ वर्षापूर्वी अंडर-१९ वर्ल्ड कप जिंकलेल्या या टीममधले विराट कोहली आणि रवींद्र जडेजा हे पुढे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधले महान खेळाडू झाले, पण उरलेल्या खेळाडूंचे करिअर फार यशस्वी राहिले नाही. विराट कोहली सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठीच्या वनडे सीरिजची तयारी करत आहे, तर विराटच्या अंडर-१९ टीममधले दोन खेळाडू इंडिया ए आणि ऑस्ट्रेलिया ए यांच्यातल्या सामन्यात अंपायर म्हणून मैदानात उतरले.भारत-ऑस्ट्रेलिया सीरिजसाठी अंपायर-३५ वर्षाचा तन्मय श्रीवास्तव आणि ३७ वर्षाचा अजितेश अर्गल हे इंडिया ए आणि ऑस्ट्रेलिया ए यांच्यातल्या वनडे सीरिजमध्ये अंपायर होते.

***

## भारताची विक्रमी २२ पदकांची कमाई

### अखेरच्या दिवशी सिमरन, प्रीती, नवदीपला रुपेरी यश



*भारतीय अपंग खेळाडूंना घरच्या मैदानावर झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत विक्रमी २२ पदकांची कमाई केली.जागतिक पॅरा ॲथलेटिक्स : भारताची विक्रमी २२ पदकांची कमाई; अखेरच्या दिवशी सिमरन, प्रीती, नवदीपला रुपेरी यश (झर्हें उीशवळीं - द)*

**नवी दिल्ली**-भारतीय अपंग खेळाडूंना घरच्या मैदानावर झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत विक्रमी २२ पदकांची कमाई केली. अखेरच्या दिवशी सिमरन, प्रीती पाल आणि नवदीप सिंग यांनी भारताच्या या यशस्वी मोहिमेची रुपेरी सांगता केली. भारताने स्पर्धेत सहा सुवर्ण, नऊ रौप्य, सात कांस्यपदके पटकावली. भारत पदकतालिकेत दहाव्या स्थानावर राहिला.ब्राझीलने (१५ सुवर्ण, २० रौप्य, ९ कांस्य) एकूण ४५ पदकांसह पदकतालिकेत अव्वल स्थान मिळवले. चीन १३ सुवर्ण आणि एकूण ५२ पदकांसह दुसऱ्या, तर इराण ९ सुवर्ण आणि एकूण १६ पदकांसह तिसऱ्या स्थानी राहिला.
महिलांच्या 'टी १२' विभागातील २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सिमरनने स्पर्धेतील दुसऱ्या पदकाची कमाई केली. तिने २४.४६ सेकंद वेळ देताना रौप्यपदक मिळिवले. व्हेनेझुएलाच्या अलेहांद्रा पेरेझ लोपेझ हिला दृष्टीहीन खेळाडूंसाठी मार्गदर्शन धावक वापरण्याच्या नियमाचे उल्लंघन केल्यामुळे अपात्र ठरवण्यात आले. त्यामुळे सिमरनला रौप्यपदक मिळाले. ब्राझीलच्या क्लासा बॅरोस डी सिल्वा हिने २४.४२ सेकंद वेळ देत सुवर्णपदक पटकावले. सिमरनने यापूर्वी याच विभागातील १०० मीटर धावण्याची शर्यत जिंकली आहे. ''घरच्या स्पर्धेत आशियाई विक्रम मोडताना दोन पदके जिंकल्याचा मला आनंद आहे,'' अशी प्रतिक्रिया सिमरनने व्यक्त केली.
महिलांच्या 'टी ३५' विभागातील २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रीती पाल चीनच्या गुओ कियानकियानला आव्हान देऊ शकली नाही. त्याामुळे तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.
पुरुषांच्या 'एफ ४१' विभागातील भालाफेक प्रकारात भारताच्या नवदीप सिंगला ४५.४६ मीटरच्या कामगिरीसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. नवदीप पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी ठरला होता. इराणच्या सादेह बेट सयाह याने ४८.८६ मीटर कामगिरीसह सुवर्णपदक पटकावले.पंतप्रधानांकडून कौतुक
भारतीय खेळाडूंच्या जागतिक पॅरा स्पर्धेतील ऐतिहासिक यशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. ''स्पर्धेतील आजपर्यंतचे सर्वोत्तम यश तुम्ही मिळिवले. तुमची कामगिरी देशातील तरुणांना नेहमीच प्रेरणादायी ठरेल,'' अशा मोदी यांनी समाजमाध्यमांवर लिहिले. ''संघातील प्रत्येक सदस्याचा मला अभिमान वाटतो. तुम्हा सर्वांना भविष्यातील प्रयत्नांसाठी शुभेच्छा,'' असेही मोदी म्हणाले.



### बक्षीस मिळालेली कार अभिषेक शर्मा भारतात चालवू शकत नाही

मुंबई : आशिया कप २०२५ मध्ये भारतीय सलामीवीर अभिषेक शर्मा याने चमकदार कामगिरी करत प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा किताब पटकावला. या यशाबद्दल त्याला सुमारे १३ लाख रुपये रोख रक्कम आणि र्क्रींश्र क९ डणत कार अशी खास बक्षीसे मिळाली. त्याच्या विजयाच्या क्षणी, अभिषेक आपल्या जवळच्या मित्रासोबत आणि संघाच्या उपकर्णधार शुभमन गिलसोबत गाडीच्या सेल्फीमध्येही झळकला.मात्र, या बक्षिसाबाबत एक गमतीशीर अडचण समोर आली आहे. र्क्रींश्र क९ ही डणत डाव्या बाजूला स्टिअरिंग असलेली आहे, आणि भारतात केवळ उजव्या स्टिअरिंगच्या गाड्यांनाच परवानगी आहे. त्यामुळे सध्या अभिषेक भारतात ही गाडी कायदेशीररित्या वापरू शकत नाही. मात्र, ही समस्या लक्षात घेत कार निर्मात्यांनी उजव्या हाताने चालवता येईल असे खास मॉडेल तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, जेणेकरून भारतीय खेळाडूंना ही गाडी प्रत्यक्ष वापरता येईल.
ही एक लक्झरी कार असून, २०१४ मध्ये बीजिंग ऑटो शोमध्ये तिचा पहिला लूक सादर झाला होता. आंतरराष्ट्रीय बाजारात या गाडीची किंमत अंदाजे २९,०००-३७,००० दरम्यान असून, भारतात तीची किंमत सुमारे २५ लाख आहे.
अभिषेकने सात सामन्यांत ४४.८६ च्या सरासरीने आणि २०० च्या स्ट्राइक रेटने एकूण ३१४ धावा केल्या. त्याच्या बॅटमधून ३२ चौकार आणि १९ षटकार झळकले, आणि त्याने तीन अर्धशतकेही ठोकली. डावखुरा असूनही त्याने वेगवान आणि फिरकी गोलंदाजांवर मोठ्या आत्मविश्वासाने हल्ला केला, ज्यामुळे भारताला अनेक वेळा उत्कृष्ट सुरुवात मिळाली.
श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात त्याला पायात क्रॅम्प आल्यामुळे तो संपूर्ण क्षेत्ररक्षण करताना बाहेर बसावं लागला, आणि याचा थोडाफार परिणाम पाकिस्तानविरुद्धच्या अंतिम सामन्यातही दिसून आला. अंतिम सामन्यात तो फारसा चमकू शकला नाही, पण संपूर्ण स्पर्धेतील त्याची सातत्यपूर्ण कामगिरी भारताच्या विजयानंतर चर्चेचा विषय ठरली.आता भारताची ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिकेसाठी तयारी सुरू आहे आणि अभिषेक शर्मा त्याच्या फॉर्मला पुढे नेण्याच्या तयारीत आहे. घरच्या मैदानात खेळताना तो पुन्हा एकदा तुफानी प्रदर्शन करेल, अशी चाहत्यांना अपेक्षा आहे.

## गिलकडे कर्णधारपद

### सामन्यात विराट कोहली, रोहित शर्माचे पुनरागमन



मुंबई : भारत ऑस्ट्रेलियाच्या दौर्यावर एकदिवसाच्या सामन्यांची मालिका आणि टी २० मालिका खेळणार आहे. अजित आगरकर यांच्या नेतृत्त्वातील निवड समितीने एकदिवसाच्या सामन्यांच्या संघाचे नेतृत्व देखील शुभमन गिलकडे दिले आहे. ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या एकदिवसाच्या सामन्यांच्या मालिकेसाठी शुभमन गिल कर्णधार तर श्रेयस अय्यर उपकर्णधार असेल.
निवड समितीनं संघ निवडीतून आगामी स्पर्धांचा विचार करत असल्याचं दाखवून दिलं आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली हे भारतीय संघाचा भाग असतील. तर, चॅम्पियन्स ट्रॉफी खेळणार्या मोहम्मद शमीला ऑस्ट्रेलिया दौर्यात संघात स्थान मिळालेलं नाही. रवींद्र जडेजा आणि संजू सॅमसन यांना देखील वनडे मध्ये स्थान मिळू शकलेलं नाही. निवड समितीनं वनडे चा संघ निवडताना २०२७ चा विश्वचषक डोळ्यासमोर ठेवल्याचे दिसते.
रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना संघात स्थान देण्यात आलंय. मात्र, शुभमन गिलकडे वनडेचं कर्णधारपद देखील सोपवलं गेले आहे. सध्या वनडेचे सामने कमी प्रमाणात होतात, त्यामुळं त्याला तयारीसाठी वेळ देण्याच्या उद्देशानं संघाची जबाबदारी शुभमन गिलवर सोपवण्यात आली आहे. भारत अ चं नेतृत्व करणार्या श्रेयस अय्यरची उपकर्णधारपदी वर्णी लागली आहे. निवड समितीनं वनडे मालिकेसाठी रवींद्र जडेजा आणि संजू सॅमसनला वगळलं आहे.

## हरजस सिंहचे ऐतिहासिक त्रिशतक



सिडनी : एकदिवसाच्या क्रिकेटमध्ये सर्वाधिक वैयक्तिक धावसंख्या करण्याचा धमाकेदार विक्रम सध्या रोहित शर्माच्या नावावर आहे, त्याने श्रीलंकेविरुद्ध २६४ धावा केलेल्या. अशातच आता ऑस्ट्रेलियाच्या हरजस सिंह याने ५० षटकांच्या सामन्यात एक नाही, दोन नाही तर तब्बल तीन शतके झळकावून खळबळ उडवून दिली आहे. हरजस याने न्यू साउथ वेल्स प्रीमियर क्रिकेट स्पर्धेत ३१४ धावांची धमाकेदार खेळी खेळली. १४१ चेंडूंच्या या खेळीत त्याने ३५ षटकारही ठोकले, ज्यात त्याने तब्बल २१० धावांची खेळी केवळ षटकांच्या जोरावर साकारली.
फक्त २० वर्षीय हरजस सिंह याने दुसर्या फेरीच्या सामन्यात वेस्टर्न सबर्ब्सकडून खेळताना सिडनीविरुद्ध शानदार त्रिशतक झळकावले. निकोलस कटलर आणि जोशुआ क्लार्क यांच्यात ७० धावांची भागीदार झाली. त्यानंतर हरजस सिंह तिसर्या क्रमांकावर फलंदाजीसाठी मैदानावर उतरला. हरजस सिंहनं सुरुवातीला सावध फलंदाजी केली. तो मैदानावर आला, थोडासा स्थिरस्थावर झाला आणि त्यानंतर मात्र त्यानं दुसरीकडे कुठेच पाहिलं नाही. अक्षरशः गोलंदाजाच्या तोंडाला फेस येईपर्यंत हरजसनं मैदानावर षट्कार आणि चौकारांचा पाऊस पाडला.
हरजस सिंह याने ३३ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. अर्धशतक पूर्ण केल्यानंतर, त्याचा वेग काहीसा मंदावला पण, काही वेळातच स्वतःला सावरत त्यानं केवळ ७४ चेंडूंमध्ये आपली शतकी खेळी पूर्ण केली. पण त्यानंतर, मात्र रुद्रावतार घेतल्याप्रमाणे हरजस येईल त्या गोलंदाजावर बरसताना दिसला. हरजसचं वादळ काही थांबण्याचं नाव घेत नव्हतं.
हरजस सिंहनं ३१४ धावांच्या खेळीत ३५ षटकार आणि १२ चौकार मारलेत, त्यात २१० षटकार आणि ४८ चौकारांचा समावेश होता. याचा अर्थ त्याने २५८ धावा फक्त चौकारांच्या मदतीने केल्या. त्याने त्याचे पहिले शतक ७४ चेंडू खेळले, परंतु त्याचे दुसरे शतक फक्त २९ चेंडूत आले. हरजसने १३२ धावांवर आपले त्रिशतक पूर्ण केले, शेवटच्या षटकात ३१४ धावांवर बाद होण्यापूर्वी. हरजसच्या धमाकेदार खेळीमुळे वेस्टर्न सबर्ब्सने ४८३ धावांचा मोठा धावसंख्या उभारला.
हरजस २०२४ च्या १९ वर्षांखालील विश्वचषकात ऑस्ट्रेलियन संघाचा भाग होता, त्यानं भारताविरुद्धच्या अंतिम सामन्यात ५५ धावा केल्या. त्रिशतक झळकावल्यानंतर हरजस सिंह म्हणाला की, मी फक्त शतक झळकावण्यात आनंदी होतो, कारण मी माझ्या आईला विचारलेलं , 'जर मी या सामन्यात शतक झळकावलं तर तू मला तुझी गाडी चालवू देशील का?
सर्वाधिक वैयक्तिक एकदिवसाच्या खेळीचा विक्रम अजूनही रोहित शर्माच्या नावावर आहे, ज्याने १३ नोव्हेंबर २०१४ रोजी श्रीलंकेविरुद्ध २६४ धावा केल्या. १७३ चेंडू चाललेल्या या खेळीत रोहितनं ९ षटकार आणि ३३ चौकार मारले. रोहित शर्मा आता फक्त वनडे खेळतो. ऑस्ट्रेलिया दौर्यासाठी विराट कोहलीसोबत त्याची संघात निवड झाली आहे. पण कर्णधार पदाची धुरा मात्र शुभमन गिलवरच देण्यात आली आहे.

## भविष्याचा विचार करून गिल कर्णधारपदी : अजित आगरकर



अहमदाबाद : भारताचा संघ तीन एकदिवसाच्या सामन्यांची मालिका आणि पाच टी २० सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाच्या दौर्यावर जाणार आहे. या दौर्यासाठी निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर यांनी संघ जाहीर केला. या दौर्याच्या संघ निवडीच्या निमित्ताने बीसीसीआयचा एकदिवसाचा विश्वचषक डोळ्यासमोर ठेवत शुभमन गिलला कर्णधार पद सोपवले. शुभमन गिलच्या नेतृत्त्वात आता रोहित शर्मा आणि विराट कोहली खेळणार आहेत. इंग्लंड विरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी रोहित शर्मा आणि विराट कोहलीने कसोटीमधून निवृत्ती घेतली होती. तेव्हा शुभमन गिलला कसोटीत कर्णधारपद सोपवले गेले होते. शुभमन गिलच्या भारतीय संघाने इंग्लंड विरुद्धची कसोटी मालिका २-२ अशा बरोबरीत सोडवली होती.
आता ऑस्ट्रेलिया दौर्यातील वनडे मालिकेच्या निमित्तानं शुभमन गिलकडे कर्णधार पद देण्यात आलं आहे. बीसीसीआयच्या या निर्णयावर शुभमन गिलनं प्रतिक्रिया दिली आहे. तो म्हणाला,तुमच्या देशाचं नेतृत्व वनडे मध्ये करायला मिळणं हा मोठा बहुमान आहे. ज्या टीमनं खूप चांगली कामगिरी केलीय त्यांचं नेतृत्व करणं हे अभिमानास्पद आहे. मी देखील चांगली करेन अशी आशा आहे, असं शुभमन गिल म्हणाला.मला वाटतं वनडे वर्ल्ड कप पूर्वी २० वनडे खेळायच्या आहेत. आमचं ध्येय दक्षिण आफ्रिकेत होणारा विश्वचषक आहे. आम्ही आता जे खेळतोय ते सर्व, प्रत्येक खेळाडू जे प्रयत्न करतोय, त्यातून याचा विश्वास आहे आम्ही वर्ल्ड कप जिंकण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. शुभमन गिलकडे भारताच्या कसोटी संघाचं नेतृत्त्व २४ मे २०२५ रोजी सोपवण्यात आलं होतं. त्यानंतर इंग्लंड दौर्यात गिलनं त्याच्या नेतृत्वाची छाप दाखवली होती. आता ४ ऑक्टोबरला शुभमन गिलला वनडे संघाचा कर्णधार करण्यात आलं आहे. तर, टी २० टीमचा शुभमन गिल उपकर्णधार आहे. सध्या टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आहे. दरम्यान, शुभमन गिल आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सचा कॅप्टन आहे. मधल्या काळात भारताच्या झिम्बॉब्वेच्या दौर्यावर त्यानं टी २० संघाचं नेतृत्त्व केलं होतं.




भारताचा संघ : शुभमन गिल- कर्णधार, श्रेयस अय्यर- उपकर्णधार, विराट कोहली, रोहित शर्मा, अक्षर पटेल, के.एल. राहुल नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्णा, ध्रुव जुरेल, यशस्वी जैस्वाल.

वनडे मालिकेचं वेळापत्रक
१९ ऑक्टोबर - पहिली वनडे (पर्थ)
२३ ऑक्टोबर- दुसरी वनडे (एडिलेड)
२५ ऑक्टोबर- तिसरी वनडे (सिडनी)

# आयटीआय परीक्षेत देशात दुसरी आलेली रेणापूरची कन्या कु. मदिया सय्यद हिचे आ. कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय व्यवसाय प्रशिक्षण (आयटीआय) तर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत रेणापूर येथील स्वातंत्र्य सैनिक मुर्गाप्पा खुमसे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विजतंत्री विभागात रेणापूर येथील कु. मदीया खदीर सय्यद या विद्यार्थिनीने ९९.६६ टक्के गुण घेऊन देशात द्वितीय क्रमांक मिळविला. या यशाची दखल घेऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या हस्ते नुकताच गौरव करण्यात आला. अत्यंत अभिमानास्पद मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी कु. मदीया खदीर सय्यद या विद्यार्थिनीचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

कु. मदीया खदीर सय्यद या विद्यार्थिनीचे वडिल बांधकाम कामगार आहेत. घरची परिस्थिती अगदी जेमतेम असून अशा प्रतिकूल परिस्थितीत या विद्यार्थिनीने चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आपले आयटीआय मधील विजतंत्रीचे शिक्षण पूर्ण केले. कौशल्य रोजगार व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांनी या गुणवंत विद्यार्थीनीस दिल्ली येथे झालेल्या चौथ्या दिक्षांत समारंभात कु. मदिया हिला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. हा गौरव केवळ विद्यार्थिनीचा नसून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाबरोबरच



संपूर्ण लातूर जिल्ह्याचा अभिमान वाढविणारा आहे. कु. मदीया खदीर सय्यद तिने प्राप्त केलेल्या घवघवीत यशाबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी कु. मदीया सय्यद या विद्यार्थिनीचे वडील खदीर सय्यद, चुलते आजम सय्यद, सय्यद मुसा जमाल, आई सय्यद शाहीन खदीर यांच्यासह रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे शहराध्यक्ष अच्युत कातळे, दत्ता सरवदे, उज्वल कांबळे, चंद्रकांत कातळे, मनीषा मुंडे, महेश गाडे, शेख शफीयोद्दीन, राजकुमार आलापुरे, शेख अजीम, रफिक शिकलकर, शेख खुद्दुस, मारूफ अत्तार, रमेश वरवटे, संतोष राठोड, नंदकिशोर बंडे, मनोज चक्रे, राम दत्त, लतीफ मुल्ला, सचिन सिरसकर, सूर्यकांत कुडके यांच्यासह इतर अनेक जण होते.

## खरोसा येथे हजरत नवाब साहेब दर्गा संदल उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** दरवर्षी प्रमाणे यंदाही खरोसा तालुका औसा येथील हजरत नवाब साहेब दर्गा संदल शुक्रवारी सायंकाळी ८:३० वाजण्याच्या सुमारास पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला.सुरुवातीला मानाप्रमाणे या दर्गाह चे मुतवल्ली व्यवस्थापक बाशामियाँ निजामोद्दीन मुजावर यांच्या घरून संदलची सुरूवात वाजत,गाजत होवून ती पायी,पायी जुन्या रामेगाव रस्त्याने हजरत नवाब साहेब यांच्या जयघोषात पुढे,पुढे दर्गाह परिसराकडे निघाली. पुढे ते दर्गाहच्या दक्षिणेकडील मुख्य प्रवेशद्वारातून दर्गाह मस्जिद च्या परिसरात येवून सर्व भाविकांनी वजुह करुन घेतले व दर्गाहच्या मुख्य ठिकाणी उपस्थित झाले.

यानंतर संदलच्या मुख्य कार्यक्रमात भाविकांनी तुरबतीला संदल लावले,कापडी गिलाफ चडविले,फुलांची सुंदर चादर चढवून वरती झेला लटकविण्यात आला नंतर अत्तर तिकडून उदबत्ती लावून ऊद घातले.यानंतर कुराणातील आयते वाचली,सलाम झाल्यावर सकल मानवजातीच्या कल्याणासाठी दुवां मागण्यात आली नंतर मिलाद संपन्न झाली आणि पुढे उपस्थित भाविक भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी पूर्व निवेदन देऊनही दरवर्षी आवर्जून उपस्थित असणारे किल्लारी पोलिसांची अनुपस्थिती सर्वांना जाणवली.

यावेळी खरोसा नगरीचे प्रथम नागरीक तथा सरपंच प्रशांत डोके,खरोसा ग्रामपंचायत चे उपसरपंच विशाल क्षिरसागर, सामाजिक कार्यकर्ते दिनकर बोयणे,दर्गाहचे मुतवल्ली व्यवस्थापक बाशामियाँ मुजावर,ईसा मुजावर,अहेमदपाशा मुजावर,जाफर मुजावर, वजीर मुजावर,हसन सय्यद, वजीर सय्यद, सज्जाद शेख,ताहेर शेख,आलीम शिकलकर,अय्युब शेख, शामराव कोकळगावे, नागोराव जाधव, मौलाना रहमतुल्ला,ताहेर पटेल,वाशिम मुजावर, फैय्याज इंद्राळे,अल्ताफ मुजावर,आफताब मुजावर, सुलतान मुजावर, फैय्याज मुजावर,जैनु मुजावर,अतुल सांडुर, महेश मुसांडे,भागवत कांबळे, सरदार हाडगेवाले,माधव कांबळे,ताहेर शेख,अब्दुल हमीद मुजावर,जैनू मुजावर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ईसा मुजावर, जाफर मुजावर,अहमद मुजावर, वजीर मुजावर,अल्ताफ मुजावर,वाशिम मुजावर, सुलतान मुजावर,जैनु मुजावर, आफताब मुजावर व गावातील उपस्थित भाविकांनी विशेष परिश्रम घेतले.

## NSUI (विद्यार्थी काँग्रेस) लातूर जिल्हा निरीक्षक श्रीमती राधिका देशमुख यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** NSUI लातूर जिल्हा निरीक्षक श्रीमती राधिकाजी देशमुख यांचा लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने लातूर येथे सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास लातूर शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष ड. किरणजी जाधव, जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके, तसेच NSUI लातूर जिल्हाअध्यक्ष रामराजे काळे, NSUI राज्य समन्वयक रोहित बिराजदार, NSUI जिल्हाउपाध्यक्ष अँड. उज्वल बडगे, NSUI जिल्हा प्रसिद्धीप्रमुख कमलेश वारद व महेश साळुंके, प्रशांत रेड्डी व NSUI चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी देशमुख यांनी विद्यार्थी संघटना अधिक मजबूत व प्रभावी करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.

दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी शाहू कॉलेज, दयानंद कॉलेज, प्रयागबाई पाटील कॉलेज, व्हिडिएफ कॉलेज व राजमुद्रा अकॅडमी या शिक्षणसंस्थांना भेटी दिल्या. दुपारी नियोजित बैठकीदरम्यान विविध महाविद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. भेटीवेळी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य गायकवाड सर यांनी श्रीमती राधिकाजी देशमुख यांचा सत्कार करून त्यांचे स्वागत केले.

## हारवाडी येथील नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करून नागरिकांना पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दिलासा दिला

**लातूर/प्रतिनिधी :** मागील काळात झालेल्या सततच्या पावसाने आणि पूरपरिस्थितीमुळे रेणापूर तालुक्यातील मौजे हारवाडी येथील नुकसानीत आलेल्या शेतीची आणि मांजरा नदीकाठची पाहणी करून जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सर्व नुकसानग्रस्तांना शासन मदत करेल असा उपस्थित नागरिकांना दिलासा दिला यावेळी भाजयुमोचे प्रदेश सचिव मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड उपस्थित होते.

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी शनिवारी सायंकाळी रेणापूर तालुक्यातील मौजे हारवाडी गावात जाऊन गावालगत असलेल्या मांजरा नदीकाठची आणि नुकसानीत आलेल्या शेतीची पाहणी केली. यावेळी उपस्थित नागरिकांनी नदीला पाणी असो अथवा नसो मांजरा नदीच्या पलीकडे जाण्यासाठी शेतकऱ्यांना सातत्याने अडचणी होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. नदीवर पुलाची उभारणी करावी, नदीकाठच्या जमिनी खरडून गेल्या, गावातील पाणीपुरवठा योजना अर्धवट



अवस्थेत असून हारवाडी जवळगा रस्त्याचे काम व्हावे यासह विविध मागण्या मांडल्या.

हरवाडी येथील शेतकऱ्यासह नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन पाणीपुरवठा योजनेचे काम तातडीने सुरू करावे, नव्या पुलाचा प्रस्ताव तयार करावा अशा संबंधितांना सूचना देऊन सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासन मदत करणार असल्याचे सांगून पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की, ज्यांचे नुकसान झाले आहे अशा सर्व नुकसानग्रस्तांना गरजूंना शासनाची मदत मिळाली पाहिजे चुकीच्या व्यक्तीला मदत जाणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे बोलून दाखविले. युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी शेतीचे झालेले नुकसान आणि रस्ते, पुल व इतर सार्वजनिक मालमत्तेचे झालेल्या नुकसानाची माहिती दिली.

या पहाणी दौऱ्यात पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या समवेत जिल्हाधिकारी वर्षाताई ठाकूर - घुगे, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता थोरात, कार्यकारी अभियंता निळकंठ, रेणापूरचे तहसीलदार थोरात, गटविकास अधिकारी सुमित जाधव, भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, सांगायो समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, प्रताप पाटील, माजी सभापती अनिल भिसे, माजी उपसभापती अनंत चव्हाण, वसंत करमुडे, लक्ष्मण यादव, राजकुमार मानमोडे, संजय डोंगरे, सुरेश बुड्डे, नारायण राठोड, निवृत्ती चिद्रे, हरवाडी येथील सरपंच बंकट कातपुरे, चंद्रकांत माने, बालाजी चोथवे, सतीश माने, आशोक गंगथडे, शिखंडी हरवाडीकर, राजू इंगळे, किरण इंगळे, राजाभाऊ इंगळे, नानासाहेब माने, भागवत ढोरमारे, सतीश चोथवे, विलास माने, हनुमंत कातपुरे, सोपान चोथवे, गोविंद ढोरमारे, तानाजी माने, भारत गाडेकर यांच्यासह शेतकरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ८ ऑक्टोबर रोजी जागेवरच निवड संधी रोजगार मेळव्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी अर्थात प्लेसमेंट ड्राईव्हचे ८ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना यामध्ये सहभागी होता येणार आहे.

या रोजगार मेळाव्यात जिल्हयातील नामांकित एकूण ०४ आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. लातूर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी, लि.लातूर, मांजरा महिला अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लातूर, पावरकॉम व्हेंनचर्स इंडिया प्रा.लि. नीट इंडिया प्रा.लि. लातूर या आस्थापनेमध्ये एकूण ४० जागेसाठी विविध पदांसाठी जागेवरच निवड केली जाणार आहे.

## ७२ तास संगीत महायज्ञ भवानी दयानी भैरवीने उत्साहात संपन्न

### विद्या भागवत यांच्या गायनाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री ज्ञानसरस्वती मंदिर संस्थान,मराठवाडा संगीत कला अकादमी आणि रिसर्च सेंटर, सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर यांच्या वतीने संगीत महायज्ञाचे उदगाता तालमणी डॉ. राम बोरगावकर यांच्या संकल्पनेतून प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी ज्ञानसरस्वती मंदिर सभागृह, संगीत नगरी, बार्शी रोड,लातूर याठिकाणी चाललेल्या ७२ तास अखंड संगीत महायज्ञात महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील अनेक दिग्गज कलावंतांनी आपली संगीत सेवा रुजू करून लातूरकर रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या संगीत महायज्ञाप्रसंगी जयपूर आत्रोली घराण्याच्या गानपंडिता किशोरीताई अमोणकर यांच्या पट्टशिष्या सुविख्यात गायिका विदुषी विद्या भागवत यांनी भूप रागामध्ये विलंबित ख्याल बंदिश व नंतर राग नंदमध्ये मध्यलय झपताल मध्ये त्यांनी चीज गायली. त्यांच्या धीरगंभीर आलापिने श्रोते ब्रह्मानंदात डुंबून गेले. त्यांना तंबोरा स्वरसंगत मधुवंती बोरगावकर यांनी केली.तानपुरा साथ सुबोध यांनी









केली,तबलासंगत कार्तिकेय स्वामी यांनी तर हार्मोनियम साथ ऋतुजा कुंटे यांनी केली.

याप्रसंगी औसा येथील ज्येष्ठ गायक शिवरुद्र स्वामी यांनी मुलतानी राग तयारीनेआळविला आणि श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेतला. चैतन्य पांचाळ यांनी राग बागेश्रीमध्ये बडा ख्याल व छोटा ख्याल राग आळवीला. त्यानंतर लातूर नगरीचे ज्येष्ठ गायक पंडित विठ्ठलराव जगताप यांनी संत तुकारामांचा अभंग गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांना तबलासाथ पं.शंकर जगताप तर हार्मोनियम साथ श्री. गणेश सुतार यांनी केली. याप्रसंगी संभाजीनगर येथील ज्येष्ठ तबलावादक प्रा.अनिल डोळे ,ईशांत डोळे, पं. विश्वनाथ बेहरे, प्रसाद शिंदे यांनी बनारस घराणा वादन शैलीनुसार ताल तीनताल पंचमसवारी मध्ये अतिशय तयारीने वादन करून रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. सरस्वती बोरगावकर - शिलवंत यांनी आपली गायनसेवा उत्स्फूर्तपणे सादर करून रसिकांची उत्स्फूर्त दाद घेतली त्यांना हार्मोनियम साथ प्रा. बाबुराव बोरगावकर यांनी केली तर तबलसंगत अमरीश शीलवंत यांनी केली.त्यानंतर किशोरीताई अमोणकर यांच्या पट्टशिष्या मधुवंती बोरगावकर - देशमुख यांनी राग बागेश्रीमध्ये बडाख्याल व छोटाख्याल अतिशय तयारीने आळवला. त्यानंतर त्यांनी बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल हा अभंग गाऊन श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद घेतली. शेवटी ''सहेला रे '' ही किशोरीताई याची बंदिश अतिशय तयारीने सादर करून रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.त्यांना तबलासंगत प्रा. गणेश बोरगावकर आणि प्रा. राजेंद्र भोसले यांनी केली. तर हार्मोनियम साथ सूरमणी पं.बाबुराव बोरगावकर यांनी केली.त्यानंतर लातूरची सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना श्वेता तंत्रे - पाटील व त्यांच्या चमूने बहारदार कथ्थक नृत्य सादर करून रसिकांची उत्स्फूर्त दाद घेतली.

या संगीत महोत्सवाच्या समारोपाप्रसंगी सुरमणी पं. बाबुराव बोरगावकर यांनी राग बागेश्रीमध्ये बडाख्याल आळवला व द्रुतबंदिश व एकतालमध्ये तराना अतिशय तयारीने गायिला शेवटी त्यांनी भवानी दयानी ही प्रसिद्ध भैरवी गाऊन उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.त्यांना तबलासंगत तालमणी डॉ.राम बोरगावकर यांनी केली.या कार्यक्रमास श्री.तुकाराम पाटील,लातूर शहर पोलिस उपअधीक्षक श्री.समीर साळवे,समाजकल्याण उपायुक्त श्री.अविनाश देवशटवार,श्री. गायकवाड सर,श्री.श्रीकांत हिरेमठ, अॅड.दासराव शिरूरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या तीन दिवस चाललेल्या संगीत समारोहाचे प्रभावी सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. सुदाम पवार आणि प्रा. विश्वनाथ स्वामी यांनी केले. तर या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. लक्ष्मण श्रीमंगले, प्रा.विश्वनाथ स्वामी, प्रा.गणेश बोरगावकर,प्रा. नामदेव साठे,प्रा.अमोल जाधव यांनी परिश्रम घेतले.

## विलास साखर कारखान्याच्या सभासदांना दिपावलीची गोड भेट; सवलतीच्या दराने साखर विक्रीचा शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** विलास सहकारी साखर कारखान्याने आपल्या सभासद आणि कर्मचाऱ्यांची दिपावली गोड व्हावी या उद्देशाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कारखान्याच्या वतीने दिपावली-२०२५ सणाकरिता (गौरी गणपती आणि गुढीपाडवा सणांचाही समावेश आहे) प्रती भाग (शेअर्स) ५० किलो साखर रु.२५/- प्रति किलो या सवलतीच्या दरात विक्रीचा शुभारंभ आज करण्यात आला. सोमवार, ६ ऑक्टोबर २०२५ रोजी कारखाना कार्यक्षेत्रालीत सर्व गट कार्यालयात साखर विक्रीचा औपचारिक शुभारंभ व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, कारखान्याचे आजी आणि माजी संचालक यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचे मार्गदर्शन तसेच संस्थापक चेअरमन, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, माजी आमदार धिरज विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विलास साखर कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू आहे. नुकत्याच झालेल्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विलास साखर कारखान्याने येणाऱ्या गळीत हंगामात प्रती टन ३,१५१ रुपये दर देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. तसेच सभासद व कर्मचाऱ्यांची दीपावली गोड व्हावी यासाठी सवलतीच्या दरात साखर वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विलास साखर कारखाना सभासदांना सवलतीची साखर विक्रीचा दर २५/- प्रति किलो (रोखीने) साखरेची मात्रा: ५० किलो साखर प्रती भाग (शेअर्स) विक्री, कालावधी: सोमवार, ०६ ऑक्टोबर २०२५ ते सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ वेळ: सकाळी ९.३० वाजल्यापासून सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत विक्री केंद्र: कारखान्याच्या सर्व शेती गट कार्यालयांमधून ही साखर वितरित केली जाणार आहे, अशी माहीती कारखान्याच्या व्यवस्थापनाच्या वतीने देण्यात आली आहे..

कारखान्याचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील आणि सर्व संचालकांनी सभासदांना त्यांच्या शेती गट कार्यालयातून वरील कालावधीत सवलतीच्या दरातील साखर घेऊन जाण्याचे आवाहन केले आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.





शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात संपन्न



कळंब (प्रतिनिधी)– आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धा–२०२५ संपन्न; मुलांमध्ये प्रथम संत तुकाराम महाविद्यालय, कन्नड तर द्वितीय पारितोषिक पीईएस शारीरिक शिक्षण महाविद्यालय,छत्रपती संभाजीनगर यांनी मिळविले, तर मुलींमध्ये प्रथम पारितोषिक श्री स्वामी समर्थ महाविद्यालय, रुईभर तर द्वितीय पं. जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर विजेत्या संघांना पारितोषिक प्रदान करण्यात आला.कळंब येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.३ व ४ ऑक्टोबर दरम्यान आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धा संपन्न झाल्या.

अनुक्रमे मुलांमध्ये प्रथम पारितोषिक संत तुकाराम महाविद्यालय, कन्नड यांनी तर द्वितीय पीईएस शारीरिक शिक्षण महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी मिळविले. मुलींमध्ये प्रथम पारितोषिक श्री स्वामी समर्थ महाविद्यालय, रुईभर तर द्वितीय पारितोषिक पं. जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी प्राप्त केले. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक ट्रॉफी, गोल्ड , सिल्व्हर मेडल आणि प्रमाणपत्र देण्यात आले.

नुकत्याच बॅडमिंटन स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रसंगी व्यासपीठावर ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संस्थेचे सचिव डॉ.अशोकराव मोहेकर, प्रा.डॉ.संजय कांबळे (अधिसभा सदस्य,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), डॉ.साजेद चाऊस, प्राचार्य डॉ. हेमंत भगवान आणि उपप्राचार्य के.डी.जाधव उपस्थित होते.

या स्पर्धेचे विद्यापीठ प्रतिनिधी डॉ.अभिजित सिंग दिख्खत यांनी क्रीडा नियोजन कार्यभार पहिला.

स्पर्धेचे प्रा.डॉ.आप्पासाहेब बोंदर, प्रा.सूरज गपाट, प्रा.डॉ.अभिजित मोहेकर यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रा. डॉ.दीपक सूर्यवंशी यांनी मानले. यावेळी अरविंद शिंदे, संतोष मोरे, अधीक्षक हनुमंत जाधव, प्रा.मेहराज तांबोळी, प्रा. शाहरुख शेख, आदींनी परिश्रम घेतले. विविध महाविद्यालयातील खेळाडू, प्रशिक्षक, प्राध्यापक व क्रीडा क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.

# धाराशिव शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकपूर्ती निमित्त विजयादशमी उत्सव साजरा




धाराशिव (प्रतिनिधी)– राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त धाराशिव शहरात विजयादशमी उत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध रीतीने साजरा करण्यात आला. शहरातील विविध शाखांमधील सुमारे ३०० स्वयंसेवकांनी पथसंचलनात सहभाग घेतला, तर ३५० हून अधिक नागरिकांनी उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याचा मान मिळवला. स्वयंसेवकांच्या एकसंध आणि शिस्तबद्ध पथसंचलनाने शहरात अनुशासन, देशभक्ती आणि संघकार्याचा संदेश प्रभावीपणे पोहोचवला. दरम्यान पथसंचलनाची सुरुवात शासकीय अध्यापक (डाएट कॉलेज) विद्यालय, बार्शी नाका येथून झाली. येथून जिजामाता चौक, काळा मारुती चौक, आठवडी बाजार चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे समता कॉलनीतील परिमल मंगल कार्यालयात पथसंचलनाचा समारोप झाला.

स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध संचलनाने उपस्थित नागरिकांवर देशभक्ती आणि संघटित शक्तीचे दर्शन झाले. तसेच पथसंचलनानंतर परिमल मंगल कार्यालयात आयोजित मुख्य कार्यक्रमात स्वयंसेवकांनी योगासने, कवायती आणि सूर्यनमस्कार यांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर केली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अभिनव इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिभा सतिश मोदानी, तर प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र संघचालक डॉ.जयंतीभाई भाडेसिया उपस्थित होते.

यावेळी डॉ. जयंतीभाई भाडेसिया यांनी आपल्या प्रेरक मार्गदर्शनात पंचपरिवर्तन या विषयावर सविस्तर भाष्य केले. समाजजीवनातील विविध क्षेत्रांत पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवण्यासाठी स्वयंसेवकांनी सक्रिय योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मागील शंभर वर्षांच्या प्रवासाचा आणि समाजनिर्माणातील योगदानाचा त्यांनी थोडक्यात आढावा घेतला. विजयादशमी हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक प्रमुख उत्सव असून, यंदा शतकपूर्ती वर्षाशी जोडला गेल्याने या उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. स्वयंसेवक आणि उपस्थित नागरिकांनी शिस्त, देशभक्ती आणि संघशक्तीचा संदेश देत या उत्सवाचे औचित्य साधले.

शहरवासीयांनीही या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याला पाठिंबा दर्शवला. हा उत्सव केवळ विजयादशमीचा उत्साहच नव्हे, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकपूर्तीच्या निमित्ताने समाजात एकता, शिस्त आणि देशप्रेमाचा संदेश रुजवण्याचा एक यशस्वी प्रयत्न ठरला.

**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**

# अभाविप धाराशिव शाखेच्या वतीने मोफत पाणी वाटप




धाराशिव (शीला उंबरे–पेंढरकर)–अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, धाराशिव शाखेच्या च्या सेवार्थ विद्यार्थी (SFS) या गतिविधी अंतर्गत शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त धारासुर मर्दानी येथे मोफत पाणी वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा संयोजक कु. वैष्णवी थिटे, शहर मंत्री कु. साक्षी पाटील, SFS संयोजक कु. कृष्णाली राऊत, सहसंयोजक कृष्णा अनंदगावकर, सहमंत्री गजानन माळी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे घवघवीत यश

धाराशिव (शीला उंबरे–पेंढरकर)– दिनांक ३ व ४ ऑक्टोबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर येथे विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा संपन्न झाली. या संशोधन स्पर्धेमध्ये आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रद्धा सलगरे हिने पदवी स्तरावर मेडिसिन व फार्मसी विभागात द्वितीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध संशोधन प्रकल्प सादर केले होते. त्यामध्ये श्रद्धा सलगरे हिने सादर केलेल्या बीयौंड प्लांट हार्मोन्स ब्रासिनोस्टिरॉइड्स थेराप्युटिक मॉड्युलेटर्स ऑफ इन्फ्लामेटरी सिग्नलिंग पाथवे या प्रकल्पाला परीक्षकांनी द्वितीय पारितोषिक जाहीर केले. विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. हे यश के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयासाठी अभिमानास्पद ठरले असून, महाविद्यालयाच्या संशोधन क्षेत्रातील कामगिरीला नवी दिशा मिळाली आहे. अविष्कार संशोधन स्पर्धे साठी डॉ. शिवशंकर गुंजेगावकर, डॉ. नागेश तौर, प्रा. नदीम खान यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री सुधीर (अण्णा) पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आदित्य पाटील, संचालक श्री. संतोष कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल जोशी, तसेच सर्व प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांनी श्रद्धा हिचे अभिनंदन केले.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१ धाराशिव**

**पत्ता–सिंचन भवन, आनंद नगर, धाराशिव**

ईमेल-eekmcd1@gmail.com दुरध्वनी क्र/.ईमेल-(02472)228745

**ई–निविदा सुचना क्र.०१ सन २०२५–२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1 धाराशिव. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1 धाराशिव यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| |
|---|
| १. कामाचे नाव : उ.सि.यो. क्र.२ अंतर्गत टप्पा क्र.४ मधील उर्वरित कामे (पांगरदरवाडी पंपगृहाचे आतील बाजूस Wire Mesh to Windows व Pump Floor Slab वर chequred Plate Flooring करणे, 33 KV Switch Yard करिता Retaining Wall चे बांधकाम करणे, Providing Cable trench cover for switchyard, Control room for 33 KV switching station at Pangardarwadi Pump House) तसेच पांगरदरवाडी पंपगृहाच्या बाजुस Backfiling चे काम करणे. |
| २. कामाचा जिल्हा : धाराशिव (महाराष्ट्र राज्य) |
| ३. निविदेची किंमत : रु.१५०.८८ लक्ष (वस्तु व सेवा कर वगळून) |
| ४. ई निविदा उपलब्ध कालावधी : दि.०६.१०.२०२५ ते दि.१३.१०.२०२५ |
| ५. ई निविदा उघडण्याचा दिनांक : दि.१५.१०.२०२५ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे |
| ६. इसारा / बयाना रक्कम : रु.१.५० लक्ष/– |
| ७. काम पूर्ण करण्याचा कालावधी : १२ महिने |
| ८. ई निविदा संचाची किंमत : रु. २३६०/– (वस्तु व सेवा कर सह) |
| ९. कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग : निविदेतील अटी व शर्ती पुर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार |

ई निविदा बाबत सर्व माहिती खालील ठिकाणी उपलब्ध आहे.
i) शासनाचे संकेतस्थळ – https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)
ii) कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. १, विभाग, धाराशिव यांचे कार्यालयातील नोटीस बोर्ड

जा.क्र. कृमबांविक्र.1/लेखा–2/ई–निविदा/1990
कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1
उस्मानाबाद यांचे कार्यालय,
दिनांकः–29-09-2025

स्वाक्षरित/–
कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम
विभाग क्र.१ धाराशिव

# अतिवृष्टीमुळे घर कोसळले,शरण फाऊंडेशनने औदार्य दाखवले

उमरगा : लोहारा तालुक्यातील अचलेर येथील भिमाशंकर माळगे व हिप्परगा (रवा) येथील सततच्या पावसामुळे रियाज मुलाणी यांचे घर कोसळून संसार उघड्यावर आला. या दोन्ही कुटुंबाला संकटाच्या काळात शरण पाटील फाऊंडेशनने सामाजिक औदार्य दाखवत भाजपाचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांच्या हस्ते प्रत्येकी २१ हजार रुपयाची मदत देण्यात आली.

मागील २० दिवसांपासून उमरगा व लोहारा तालुक्यात पावसाने आहाकार माजवला आहे. अनेकांची खरीपाची पिके वाहुन गेली आहेत तर उर्वरित उभ्या पिकांना क–या येत आहेत. विविध गावातील नदी व ओढयाकाठच्या शेतात पाणी शिरल्याने पिकांसह माती वाहून गेली आहे. अनेकांची घरे पडून संसाराचा चिखल झाला आहे तर कांही गुरे ढोरे ही वाहुन गेली आहेत. अस्मानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यांना धीर देण्यासाठी उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील व तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांनी तालुक्यातील अचलेर, आष्टा कासार, जेवळी, तावशीगड, सास्तुर, हिप्परगा रवा येथे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी अचलेर येथील भिमाशंकर माळगे व हिप्परगा (रवा) येथील सततच्या पावसामुळे रियाज मुलाणी यांचे घर कोसळून संसार उघड्यावर आला. या दोन्ही कुटुंबाला भेटल्यानंतर शरण पाटील फाऊंडेशनने सामाजिक औदार्य दाखवत फाउंडेशनच्या वतीने भाजपाचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांनी प्रत्येकी २१ हजार रुपयाची मदत दिली. यावेळी तहसीलदार रणजितसिंह कोळेकर, गटविकास अधिकारी जगदेव व्हग्गे, लोहारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत काळे, मुरुम बाजार समितीचे उपसभापती बसवराज कारभारी, भाजपाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, पंसचे माजी सभापती सिद्रामप्पा दुलंगे, बुद्धिवंत साखरे, दीपक मुळे, योगेश राठोड, हरी लोखंडे, दत्तात्रय गाडेकर, आष्टा कासारचे सरपंच सुलभा कांबळे, दिपक पाटील, रब्बानी नळेगावे, बालाजी वडजे, धीरज घोटाळे, योगेश आळंगे, प्रशांत आळंगे, सुजित शेळके, विजय लोमटे, विनोद मोरे, सुनिल जाधव, मुरलीधर होनाळकर, गंगाधर बलसुरे, शिवराज कमलापुरे, प्रकाश लोखंडे, राजु मुल्ला, परमेश्वर पटणे, केदार कदारे, झपु काझी, बालाजी चव्हाण, दयानंद साळुंके, अब्बास शेख आदीसह मंडळाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व शेतकरी उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649